सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - ६६ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ मंगळवार दि. १ एप्रिल २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## गुजरातमध्ये अग्नीतांडव! फटाका कारखान्यात भीषण स्फोट, १७ जणांचा मृत्यू; मालक फरार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१गांधीनगर**

गुजरातच्या बनासकांठामध्ये एका फटाक्याच्या कारखान्यात भीषण स्फोट झाला आहे. या भीषण स्फोटात १७ जणांचा मृत्यू झाला असल्याची माहिती मिळाली आहे. मृतांचा आकडा वाढण्याची भीती वर्तवली जात आहे. कारखान्यात असलेल्या बॉयलरचा स्फोट झाला, त्यामुळे ही दुर्घटना घडली. स्फोट झाला तेव्हा कारखान्यात ३० कामगार काम करत होते. घटनास्थळी अग्निशमन दलाचे जवान पोहोचले असून आग विझवण्याचे शर्थीचे प्रयत्न सुरु आहेत.



बनासकांठातील डीसा भागात असलेल्या फटाका कारखान्यात सकाळी नऊच्या सुमारास स्फोट झाल्याची माहिती समोर आली आहे. स्फोटाचा आवाज ऐकताच आसपासचे लोक कारखान्याजवळ पोहोचले. तेव्हा कारखान्यातून आगीच्या ज्वाळा बाहेर पडत होत्या. याची माहिती लगेच एसडीआरएफ आणि अग्निशमन दलाला देण्यात आली. डीसा ग्रामीण पोलीस ठाण्याचे निरीक्षक विजय चौधरी यांनी दिलेल्या माहितीनुसार, या स्फोटामुळे कारखान्याचं मोठं नुकसान झालं आहे. भिंती, छप्पर कोसळलं असून ढिगाऱ्याखाली काही कामगार अडकले आहेत. जखमींना जवळच्या रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आलं आहे. तर स्फोटाच्या तपासाचे आदेश देण्यात आलेले आहेत.

दरम्यान, दीपक ट्रेडर्स नावाच्या कारखान्यात हा भीषण स्फोट झाला आहे. या ठिकाणी फटाके तयार केले जातात. स्फोटानंतर कारखान्याचा मालक फरार झाला आहे. जिल्हाधिकारी माहिर पटेल घटनास्थळी पोहोचले आहेत. या कारखान्याला फटाके तयार करण्याचा परवाना मिळाला होता की नाही? याची चौकशी सध्या केली जात आहे.

## आपण दिलेली भेट आम्ही स्वीकारू, पण...; महाराष्ट्रातील मुस्लीम बांधवांचे पंतप्रधान मोदींना पत्र

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १अहिल्यानगर**

रमजान महिन्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना संगमनेरातील मुस्लीम बांधवांनी पत्र पाठवले आहे. आम्हाला आपले अभिनंदन करावं वाटतं की, तिसऱ्यांदा पंतप्रधान झाल्यानंतर आपण कुठलाही कटुतेचा भाव न ठेवता पवित्र अशा रमजान महिन्यात 'सौगात-ए-ईद' या उपक्रमासाठी प्रथमच पुढाकार घेतला. आपण दिलेली भेट आम्ही स्वीकारणारच आहोत. परंतु त्या मिठाईचा खरा आनंद आम्हाला तेव्हाच होईल, ज्या दिवशी दिवसरात्र हिंदू-मुस्लिम असा द्वेष पसरवणाऱ्या लोकांविरुद्ध आपण कडक शासन कराल, हीच




कळकळीची विनंती, असं या पत्रात म्हटलं आहे.

उपविभागीय अधिकारी शैलेश हिंगे यांच्या माध्यमातून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र पाठवण्यात आलं आहे. आपला भारत देश विविधतेने नटलेला असून सर्वच जातिधर्मातील लोक, निरनिराळ्या भाषांचे लोक खूप प्रेमाने गेल्या हजारो वर्षांपासून एकत्र राहत आहेत. आपला देश एकतेचा संदेश देणारा देश आहे. राम-रहिम संस्कृती जपून गेल्या अनेक वर्षांपासून एकमेकांचे सण उत्सव, नवरात्र, गणेशोत्सव, रमजान या देशातील सर्वसामान्य नागरिक आनंदाने साजरा करत आहे. आपण आमच्याबद्दल विचार केला म्हणून आम्ही आनंदित आहोत. परंतु पवित्र अशा रमजान महिन्यात आम्ही ही भावना आपल्यापर्यंत पोहचवू इच्छितो की, देशात हिंदू-मुस्लिम वातावरण निर्माण करणाऱ्या समाजकंटकांच्या विषयीदेखील आपण व आपले सरकार पावले उचलतील त्या दिवशी आमची खरी ईद साजरी होईल. ही आम्ही समस्त मुस्लीम समाजाची भावना आपल्याप्रति व्यक्त करत आहोत, असंही पंतप्रधान मोदींना पाठवलेल्या या पत्रात म्हटलं आहे.

## धनंजय मुंडे यांचे निकटवर्तीय पोपट घनवट यांनी बीडमधील शेतकऱ्यांच्या जमिनी लाटल्या : अंजली दमानियांचा गौप्यस्फोट

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१मुंबई**

४-५ वर्षापूर्वी पंकजा मुंडे यांच्याविरोधातील काही फाईल्स घेऊन धनंजय मुंडे माझ्या घरी आले होते. त्यांच्यासोबत तेजस ठक्कर नावाची व्यक्ती होती असं सांगत सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी गौप्यस्फोट केला आहे. धनंजय मुंडे यांचे निकटवर्तीय पोपट घनवट यांनी बीडमधील काही शेतकऱ्यांच्या जमिनी लाटल्या यावरून दमानिया यांनी पत्रकार परिषद घेतली होती. त्यावेळी दमानियांनी हा गौप्यस्फोट केला.

अंजली दमानिया म्हणाल्या की, ४-५ वर्षापूर्वी धनंजय मुंडे स्वत: माझ्या घरी तेजस ठक्कर नावाच्या व्यक्तीसह आले होते. त्यांनी अख्खा फाईल्सचा बंच आणला होता. पंकजा मुंडेविरोधातल्या या फाईल्स होत्या. त्या फाईल्सची माहिती दिली. त्याआधी मला तेजस ठक्कर, राजेंद्र घनवट यांचा फोन आला होता. जेव्हा धनंजय मुंडे माझ्याकडे फाईल्स घेऊन आले तेव्हा मी अशा दिलेल्या फाईल्सवर कधीही काम करत नाही हे समजावले. त्यामुळे मी पंकजा मुंडे यांचा कुठलाही विषय मी त्यावेळी लावून धरला नव्हता असं त्यांनी सांगितले.

तसेच मी बीड प्रकरण लावून धरले तेव्हा राजेंद्र घनवट यांचे नाव मी एका चॅनेलवर घेतले. तेव्हा काही शेतकऱ्यांनी माझ्याशी संपर्क केला. माझ्या घरी आले तेव्हा राजेंद्र घनवट या व्यक्तीने शेतकऱ्यांचा छळ केल्याचं समोर आले. धनंजय मुंडे यांचे अत्यंत जवळचे राजेंद्र घनवट आहेत. या



लोकांनी ११ शेतकऱ्यांना छळून त्यांच्या जमिनी लाटल्या. कोट्यवधीच्या जमिनी कवडीमोल भावात घेतल्या. शेतकऱ्यांवर खोटे गुन्हे दाखल केले. मृत शेतकऱ्यांना जिवंत दाखवून जमिनी लाटल्या. जे शेतकरी विरोधात गेले त्यांच्याविरोधात खूनाचे, मानहाणीचे गुन्हे दाखल केले. त्यात एक पीएसआयदेखील आहे असा आरोप अंजली दमानिया यांनी केला.

दरम्यान, धनंजय मुंडे आणि घनवट यांचा काय संबंध आहे, त्यांचे आर्थिक संबंध कसे आहेत त्याची चौकशी झाली पाहिजे. २००४ पासून शेतकऱ्यांच्या जमिनी लाटल्या गेल्या. बनावट कागदपत्रे बनवण्यात आली आहे. याविरोधात यंत्रणा बोलत नाही. राजकारण्यांच्या पाठबळाने शेतकऱ्यांची फसवणूक झाली. बीडमधील शेतकऱ्यांच्या जमिनी लाटल्या गेल्यात त्याची चौकशी करावी अशी मागणी अंजली दमानिया यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली.

## मराठी गया तेल लगाने..., सुरक्षारक्षकाने दाखवला माज; मनसेनं काढला कानाखाली आवाज

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१मुंबई**

मराठीच्या मुद्द्यावरुन मुंबईत पुन्हा एकदा एकानं वाद घातल्याची घटना समोर आली आहे. पवई येथे ड्ढ कंपनीच्या सुरक्षारक्षकाने एका मराठी व्यक्तीसोबत वाद घातला. मराठीत बोलणार नाही म्हणत 'मराठी गया तेल लगाने' अशी अरेरावी केली. या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियात व्हायरल झाला. त्यानंतर मनसेच्या कार्यकर्त्यांनी थेत एल अँड टी कंपनीचं कार्यालय गाठलं आणि संबंधित सुरक्षारक्षकाला जाब विचारला.

मराठी भाषेचा अपमान सहन करणार नाही, असा पवित्रा घेत मनसेच्या कार्यकर्त्यांनी सुरक्षारक्षकाच्या



कानशिलात लगावली. त्यासोबतच त्याला माफी मागयला लावली. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनीही नुकतंच पक्षाच्या गुढीपाडवा मेळाव्यात मराठीच्या मुद्द्यावरुन आक्रमक पवित्रा घेतलेला पाहायला मिळाला. महाराष्ट्रात राहायचं असेल तर मराठीचा सन्मान झालाच पाहिजे. प्रत्येक राज्याची भाषा असते तशी महाराष्ट्राच्या मराठी भाषेचा योग्य सन्मान होत नसेल तर कानफाटीतच बसणार, असा रोखठोक इशारा राज यांनी दिला होता.

**वर्सोव्यातही डी-मार्टच्या कर्मचाऱ्याची अरेरावी**

वर्सोवा येथील डी-मार्टच्या कर्मचाऱ्यानंही एका मराठी कर्मचाऱ्यासोबत वाद घालताना 'मराठी बोलणार नाही, काय करशील?', असं म्हणत अरेरावी केली होती. त्यानंतर स्थानिक मनसे कार्यकर्त्यांनी डी-मार्टच्या कर्मचाऱ्याला जाब विचारत धडा शिकवला होता. तसंच माफीही मागायला लावली होती.

**सुरक्षारक्षकाला मनसे कार्यकर्त्यांनी दिला चोप**

कांदिवलीत एअरटेल कंपनीच्या ग्राहक सेवा केंद्रातील महिला कर्मचाऱ्यानं मराठी महत्त्वाची नाही, बोलणार नाही, असं म्हणत मराठी तरुणासोबत वाद घातला होता. त्यानंतर ठाकरेंच्या शिवसेनेनं आक्रमक पवित्रा घेत एअरटेलचं कार्यालय गाठलं होतं. महाराष्ट्रात काम करताना कर्मचाऱ्यांना मराठी बोलता आलीच पाहिजे, असा इशारा दिला होता.

## माझ्या हत्येचा कट रचण्यात आला, धनंजय मुंडेंचं नाव न घेता सुरेश धस यांचा सनसनाटी आरोप

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१बीड**

बीडमधील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणावरून सुरू झालेला भाजप आमदार सुरेश धस विरुद्ध राष्ट्रवादीचे नेते आणि माजी मंत्री धनंजय मुंडे यांच्यातील राजकीय संघर्ष थांबता थांबत नसल्याचं चित्र आहे. आमदार धस यांनी पुन्हा एकदा नाव न घेता धनंजय मुंडे यांच्यावर गंभीर आरोप केला आहे. राजस्थानमधून काही लोक इथे आणून माझ्या हत्येचा कट रचण्यात आला होता, असा दावा धस यांनी केला आहे.

सुरेश धस म्हणाले की, मला हरणाचं मांस खोक्याने पुरवलं, असा आरोप करण्यात आला. आता माझ्यावर इतकी वाईट वेळ आलीय का? मुळात मी १६ वर्षे माळकरी राहिलेलो आहे. आता डॉक्टरांच्या सल्ल्याने मांसाहार करत असलो तरी हरणाचं मांस खाण्यापर्यंत मी अजून गेलो नाही. पण इथं माझ्यावर हरणाचं मांस खाल्ल्याचा आरोप करून नंतर त्यांनी बाहेरच्या राज्यातून



विमानाची तिकिटं काढून बिश्नोई समाजाची काही लोकं आणली. याने हरणाचं मांस खाल्लंय असं सांगून बिश्नोई समाजात मला व्हिलन करण्याचा त्यांचा प्लॅन होता आणि त्यातून लॉरेन्स बिश्नोईने माझी हत्या करावी, असा कट रचण्यात आला होता, असा खळबळजनक आरोप धस यांनी 'सरकारनामा'ला दिलेल्या मुलाखतीत केला आहे.

**मुख्यमंत्र्यांना माहिती देणार**

माझ्या बाबतीत इतक्या खालच्या पातळीवर तुम्ही जात असाल तर तुमच्यासोबत मैत्री काय कामाची आहे? मला आयुष्यातून उठवण्यापर्यंत यांची मजल गेली आहे. या कटात कोण-कोण सामील होतं, याची माहिती माझ्याकडे आहे. मी राज्याच्या मुख्यमंत्र्यांना याबाबत माहिती देणार आहे,असंही सुरेश धस यांनी या मुलाखतीत बोलताना म्हटलं आहे.दरम्यान, सुरेश धस यांनी केलेल्या या आरोपांवर आता धनंजय मुंडे यांच्याकडून काही प्रत्युत्तर देण्यात येतं का, हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

## उन्हाने त्रस्त नागरिकांना थोडाफार दिलासा राज्यात पुढील २, ३ दिवसात पावसाची शक्यता

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१पुणे**

मार्चच्या महिन्यातच तापमानाचा पारा ४० अंश सेल्सिअसच्या आसपास गेल्याने चांगलाच उकाडा वाढल्याचे दिसून आले होते. दुपारी तर घराबाहेर न पडण्याचे आवाहनही करण्यात आले होते. आता मात्र गेल्या दोन, तीन दिवसांपासून ढगाळ वातावरण तयार झाले आहे. गरमी कमी झाली नसली तरी उन्हापासून नागरिकांना दिलासा मिळाला आहे. राज्यात तापमान वाढल्याने त्रस्त झालेल्या नागरिकांना थोडाफार दिलासा देणारी बातमी समोर आली आहे. पुढील दोन, तीन दिवसात राज्यात बहुतेक ठिकाणी पावसाची शक्यता वर्तवण्यात आल्याची माहिती हवामान विभागाचे डॉ. एस. डी सानप यांनी दिली आहे.

सानप म्हणाले, मागील ३ दिवस राज्यात बहुतांश ठिकाणी ढगाळ वातावरण आहे. येणाऱ्या २, ३ दिवसात राज्यात बहुतेक ठिकाणी पावसाची शक्यता आहे. कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात विजेच्या कडकडाटासह पाऊस पडण्याची शक्यता आहे. तसेच राज्यात अनेक ठिकाणी गारपीठ होण्याची शक्यता वर्तवण्यात आली असून पुणे ,नाशिक ,अहिल्यानगर जळगाव ,सातारा या ठिकाणी गारपीठ होणार असल्याचे त्यांनी सांगितले आहे. महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांना उद्या आणि परवा ऑरेंज अलर्ट असणार आहे. एप्रिल, मे, जून मध्ये देशात सरासरी पेक्षा जास्त तापमान असणार आहे. येणाऱ्या ५ दिवसात मराठवाडा, मध्य महाराष्ट्रात जोरदार पावसाची शक्यता असल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली आहे.

## कर्जमाफीचं शेतकऱ्यांना गाजर, सरकारचं नाव एप्रिल फूल सरकार ठेवावं; आदित्य ठाकरेंची टीका

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१मुंबई**

ठाकरे गटाचे आमदार आदित्य ठाकरे यांची मातोश्रीवर आज पत्रकार परिषद पार पडली. यावेळी त्यांनी विविध मुद्द्यांवरून सरकारला घेरलंय. कर्जमाफीचं शेतकऱ्यांना गाजर दाखवलं, असा आरोप आमदार आदित्य ठाकरे यांनी सत्ताधारी सरकारवर केलाय. या सरकारचं नाव एप्रिल फूल सरकार ठेवावं असं देखील त्यांनी म्हटलंय. अनेक योजना बंद होणाच्या मार्गावर आहेत. सरकारने मुंबईला पुर्णपूणे खड्ड्यात टाकलं असा आरोप देखील आदित्य ठाकरे यांनी केला आहे. मुंबईत घनकचरा कर लावण्याला ठाकरे गटाचा विरोध आहे. त्यांनी मुंबईकरांना घनकचरा कराचा विरोध करण्यासाठी आवाहन केलंय. हा अदानी कर आहे. मुंबईत अडीच वर्षांपासून वेगवेगळ्या कारणांमुळे कर लावलाच जातोय.

## आत्ता जिरली का तुझी? की अजून जिरायची?: गित्ते गँगचे हे शब्द वाल्मीक कराडला झोंबले अन् बीड कारागृहात झाला तुफान राडा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१बीड**

बीड जिल्हा कारागृहात सोमवारी वाल्मीक कराड व सुदर्शन घुलेला मारहाण करण्यात आली. बबन गित्ते व अक्षय आठवले या दोघांनी त्यांना प्रसाद दिल्याची माहिती आहे. पण त्यानंतर महादेव गित्ते व इतर चौघांनी आम्ही त्यांना नव्हे तर त्यांनीच आम्हाला मारहाण केल्याचा दावा केला. त्यामुळे कुणी कुणाला मारले? याविषयी सस्पेन्स कायम आहे. पण आता हे प्रकरण नेमके कशामुळे घडले याविषयी नवी माहिती समोर आली आहे. त्यानुसार, गित्ते गँगने पहिल्यांदा वाल्मीक कराडची खोड काढली आणि त्यानंतर तुरुंगात हा राडा झाला असे सांगितले जात आहे.

यासंबंधीच्या माहितीनुसार, बीड कारागृहात सोमवारी सकाळी नाश्त्याच्या वेळी बंदी उठवल्याने सर्व कैदी बाहेर मोकळे होते. त्यावेळी महादेव गित्ते यांच्या समर्थकांनी वाल्मीक कराडसह त्याच्या टोळीला मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येवरून टोमणे मारण्यास सुरुवात केली. आता जिरली काय तुझी? की अजून जिरायची आहे? अशी डायलॉगबाजी गित्ते गँगकडून सुरू केली गेली. यामुळे गित्ते व कराड गँगमध्ये वाद झाला. त्यात महादेव गित्ते व अक्षय आठवले हे दोघेही एकाचवेळी वाल्मीक कराडच्या अंगावर धावून गेले. तेव्हा बाजूलाच असणारा सुदर्शन घुले वाल्मीक कराडच्या मदतीसाठी धावून आल्याचे यासंबंधी सांगितले जात आहे.



महादेव गित्तेला हर्सुलला, अक्षय आठवलेला

**नाशिकला हलवले**

या घटनेनंतर बीड जिल्ह्यात एकच खळबळ माजली. तुरुंग प्रशासनाने या प्रकरणी तोंडावर बोट ठेवत अशी कोणतीही घटना घडली नसल्याचा दावा केला. पण त्यानंतर काही वेळातच बीड कारागृहातून महादेव गित्ते याच्यासह इतर ४ आरोपींना छत्रपती संभाजीनगर येथील हर्सुल कारागृहात हलवण्यात आले. त्यानंतर दुसऱ्या दिवशी अक्षय आठवलेसह मनीष क्षीरसागर व सवाई या दोघांना नाशिक कारागृहात पाठवण्यात आले. या दोन्ही घटनांमुळे बीड कारागृहात प्रत्यक्षात हाणामारी झाली होती, या वृत्ताची पुष्टी होत आहे.

**वाल्मीकला ३-४ थापडा मारल्यात**

दुसरीकडे, सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी या घटनेत वाल्मीक कराडच्या कानशिलात ३-४ हाणण्यात आल्याचा दावा केला आहे. त्या म्हणाल्या, वाल्मीक कराड हा धनंजय मुंडे यांचा अतिशय जवळचा माणूस आहे. एखादा जावई असल्यासारखे त्याला प्रोटेक्ट करताना आपण एकदा नाही तर अनेकदा पाहिले आहे. वाल्मीकला व्हीआयपी ट्रिटमेंट मिळते. त्याला छान सुखसुविधा मिळतात. मला यासंबंधी कारागृहातून मिळालेली माहिती अगदी ऑथेंटिक आहे. सदर घटनेत वाल्मीक कराडला ३-४ थापडा मारण्यात आल्यात. त्यांच्यात टोकाचा वाद झाला. प्रचंड आरडाओरडा झाला. ही साधारण मारामारी नव्हती.

## संपादकीय ......

# महत्त्वाच्या मुद्यांना बगल देऊन लोकांचे ‘एप्रिल फूल’

वर्ष २०१४ आणि २०१९ च्या निवडणूक जाहीरनाम्यात केंद्र सरकारने दरवर्षी २ कोटी नोकर्या निर्माण करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, बेरोजगारीचा दर अजूनही चिंताजनक आहे, आणि संघटित क्षेत्रात अपेक्षित रोजगारवाढ झालेली दिसत नाही. याशिवाय वर्ष २०२२ पर्यंत शेतकर्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याचे उद्दिष्ट ठेवले गेले होते. प्रत्यक्षात, शेती क्षेत्रातील आव्हाने आणि किमतीतील अस्थिरतेमुळे हेसुद्धा उद्दिष्ट पूर्ण झालेले नाही.

केंद्र आणि राज्य सरकारने १०० स्मार्ट शहरे विकसित करण्याचे आश्वासन दिले होते, परंतु २०२५ पर्यंत अनेक शहरांमध्ये पायाभूत सुविधा आणि नियोजनाच्या अंमलबजावणीला विलंब झाला आहे. राज्याची सध्याची स्थिती पाहता ही आश्वासने पुढच्या वर्षाअखेरीसपर्यंत पूर्ण होण्याची कोणतीही चिन्हे नाहीत. याआधीच्या महाविकास आघाडी सरकारने २०१९ मध्ये सत्तेवर येताना संपूर्ण कर्जमाफीचे आश्वासन दिले होते, परंतु त्याची अंमलबजावणी मर्यादित राहिली. त्यानंतर आलेल्या महायुतीच्या सरकारनेही शेतकर्यांच्या कर्जमुक्तीवर ठोस प्रगती दाखवलेली नाही, शेतकरी कर्जमाफीचा विषय केवळ राजकीय अजेंडा बनून राहिला आहे.अर्थसंकल्पीय अधिवेशनात शेतकरी कर्जमाफीच्या मुद्यावर म्हणावी तेवढी गांभीर्याने चर्चा झाली नाही, याबाबत विरोधकांनी, माध्यमांनीही सरकारला प्रश्न विचारणे अपेक्षित होते. परंतु भावनिक अशा संवेदनशील गैरलागू मुद्यांवर जनतेला चतुर राजकारण्यांनी झुलवत ठेवण्यात यश मिळवले, लोकांना तेवढा वेळ नसतो किंवा व्यवस्थेशी लढण्याची ताकद नसते, त्यामुळे त्यांची झालेली ‘बनवाबनवी’ नागरिकांचा ‘नाईलाज’ म्हणून एकवेळ समजून घेता येईल, मात्र लोकशाहीचा चौथा खांब आणि जबाबदार पत्रकारिता करण्याचे छातीठोकपणे सांगणार्या माध्यमांनीही संवेदनशील आणि गैरलागू मुद्यांमध्येच पत्रकारितेचा महत्त्वाचा वेळ घालवला. यात सत्ताधार्यांना लोकांच्या जगण्याशी जोडलेले प्रश्न विचारणे बाजूला राहिले.मुंबईतील मेट्रो प्रकल्प आणि रस्ते विकासासारख्या मोठ्या योजनांना अनेकदा विलंब होत आहे. उदाहरणार्थ, मेट्रो ३ पूर्ण होण्याची मुदत वारंवार पुढे ढकलली गेली. तर ग्रामीण आणि शहरी भागात पाणीपुरवठा आणि स्वच्छतेची आश्वासने पूर्ण करण्यात अनेक अडचणी आल्या आहेत, विशेषतः राज्यातील दुष्काळग्रस्त भागाची स्थिती स्वातंत्र्यानंतर अनेक सरकारे आली आणि गेली तरी कायम आहे, कितीतरी निवडणुका आल्या आणि गेल्या त्यानंतरही तेच प्रश्न, तीच आश्वासने, लोकांची तीच फसवणूक कायम आहे. यातील निवडक आश्वासनांचा विचार यंदाच्या एप्रिल फूलच्या निमित्ताने व्हायला हवा.केंद्र सरकारने प्रत्येक गावाला शुद्ध आणि पुरेसा पाणीपुरवठा देण्यासाठी ‘जलस्वराज्य’ आणि ’जल जीवन मिशन’ सारख्या योजनांचा विस्तार करण्याचे ठरवले होते, ते उद्दिष्ट अद्यापही पुरेसे साध्य झाले नाही. ग्रामीण भागात अनेक ठिकाणी पाणीपुरवठा योजनांचे काम अपूर्ण आहे. मराठवाड्यासारख्या दुष्काळग्रस्त भागात फेब्रुवारीतच टँकर सुरू झाले आहेत. उन्हाचा तडाखा वाढेल तशी ही संख्या वाढत जाणार आहे. पाईपलाईनद्वारे पाणी पोहोचवण्याचे उद्दिष्ट पूर्ण झालेले नाही.

मुंबई, पुणे, नागपूर,अमरावती सारख्या शहरांमध्ये पाणीपुरवठा, पाणीटंचाई, पाणी चोरी आणि पाणी गळती कमी झालेली नाही. मुंबईसारख्या शहरात अजूनही अनेक भागांत ठरावीक वेळेतच पाणी मिळते, तर पुण्यात पाणीटंचाई आणि असमान वितरणाची समस्या कायम आहे. पाणी गळतीचे प्रमाण कमी करण्यातही अपेक्षित यश मिळालेले नाही. मुंबई, ठाण्याला पाणीपुरवठा करणार्या शहापूरमधील आदिवासी गावपाड्यांमध्ये भीषण पाणीटंचाईचा प्रश्न दरवर्षी चर्चिला जातो, मात्र त्यावर अद्यापही कायमस्वरुपी उपाययोजना झालेली नाही.


‘स्वच्छ भारत अभियान’ अंतर्गत प्रत्येक घरात शौचालय उभारण्याची पूर्तता झालेली नाही, अनेक ठिकाणी शौचालये उभारली आहेत, मात्र पाणी नसल्याने त्याचा वापर होत नाही. अनेक ठिकाणी बांधकाम निकृष्ट दर्जाचे असल्याचेही समोर आले आहे. नदीजोड प्रकल्प आणि दुष्काळमुक्त महाराष्ट्राचे उद्दिष्टही साध्य झालेले नाही. पाणी साठवण, जलसंधारण, सिंचनाच्या योजना, भ्रष्टाचार, राजकीय इच्छाशक्ती, हेवेदाव्यांमुळे पूर्ण झालेल्या नाहीत. मराठवाडा आणि विदर्भातील अनेक गावांमध्ये दुष्काळाची समस्या कायम आहे. ‘जलयुक्त शिवार’सारख्या योजनांचा प्रभाव मर्यादित राहिला आणि अनेक ठिकाणी कामे अपूर्ण किंवा अर्धवट अवस्थेत आहेत.

राज्यातील ५० टक्क्यांपेक्षा जास्त लोकसंख्या शेतीवर अवलंबून आहे. परंतु अनियमित पाऊस, दुष्काळ आणि शेतमालाला योग्य भाव न मिळणे यामुळे शेतीतून पुरेसे उत्पन्न मिळत नाही, ज्यामुळे ग्रामीण बेरोजगारी वाढत आहे. ग्रामीण भागात रोजगाराची साधने उभारण्यात सरकारला अपयश आले आहे. यांत्रिकीकरण, माहिती आणि तंत्रज्ञानाचे संतुलन राखण्यात सरकारी यंत्रणांना अपयश आल्यामुळे रोजगाराचा प्रश्न जटील होत आहे. निवडणुकीआधी सरकारी भरतीचे आश्वासन पूर्ण झालेले नाही. त्यामुळे सरकारी नोकर्या रोडावल्या आहेत.वेतन आयोग, समायोजन, नव्या पदांची निर्मिती असे कित्येक प्रश्न सुटलेले नाहीत, त्यामुळे नोकर भरती मंदावली आहे. खासगी क्षेत्रातही असंघटित क्षेत्र वाढत असल्याने कामगार कर्मचार्यांच्या शोषणाला बळ मिळत आहे. संपत्तीचे असमान वितरण, शेतकर्यांचे कर्जबाजारीपण, कमी उत्पन्न आणि नैसर्गिक आपत्तींमुळे शेतकरी, कामगार गरीबीत ढकलला जात आहे. मागील वर्षी मराठवाडा विदर्भात शेतकरी आत्महत्यांचे प्रमाण अडीच हजार असे नोंदवले गेले होते. शिक्षण आणि पुरेशा आरोग्य सुविधांचा अभाव आहे.ग्रामीण भागात दर्जेदार शिक्षण आणि आरोग्य सुविधा कमी असल्याने लोकांचे जीवनमान उंचावलेले नाही. असंघटित क्षेत्रातील कामगारांची पिळवणूक थांबण्यासाठी सरकार आणि यंत्रणांकडे धोरणात्मक उपाय नाही, कामगार कायदे बासनात गुंडाळलेले आहेत, त्यामुळे शेतकरी आणि कामगारांना चांगले दिवस येण्याचे निवडणुकीआधीचे स्वप्न धुळीला मिळाले आहे. राज्यातील ९० टक्के कामगार असंघटित क्षेत्रातील असल्याने त्यांच्या पिळवणुकीचे प्रमाणही जास्तच आहे. कामगारांचे प्रश्न सुटले नसून आणखी जटील बनले आहेत.कमी वेतन, सामाजिक सुरक्षा नसणे आणि नोकरीच्या अस्थिरतेमुळे सामान्य कामगार, कर्मचारी पुरता निराश झाला आहे. ग्रामीण भागातून पोटापाण्यासाठी शहरांकडे होणारे स्थलांतर थांबलेले नाही, कोरोना काळानंतर ही स्थिती आणखी कठीण झाली आहे. दुर्गम भागात पिढ्यानपिढ्या राहाणारे आदिवासी, मागासवर्गीय, कमकुवत जात गटातले अजूनही सामाजिक न्यायाच्या प्रतीक्षेत आहेत. शिक्षण, आरोग्य, रोजगारापासून वंचित आहेत, स्वातंत्र्यापासून आजतागायत त्यांना केवळ आश्वासनेच मिळाली आहेत.

विदर्भ प्रजासत्ताक

# १ एप्रिल याच दिवशी का असतो एप्रिल फूल डे?

**दि.१ विदर्भ प्रजासत्ताक–** दरवर्षीप्रमाणे, या वर्षीही १ एप्रिल रोजी जगभरात ‘एप्रिल फूल डे’ साजरा केला जाईल. हा दिवस असा असतो जेव्हा आपल्या मित्र आणि कुटुंबांची मजामस्ती करत खिल्ली उडवली जाते. खिल्ली उडवण्यासोबतच, ते एकमेकांना विनोद देखील सांगितले जातात. एखाद्याची मस्करी करत त्याला मूर्ख बनवल्यास एप्रिल फूल असा जोरात एकच गलका केला जातो. प्रत्येकजण हा दिवस आपल्या आवडत्या लोकांसोबत वेगवेगळ्या पद्धतीने हा दिवस साजरा करतो. पण तुम्ही कधी विचार केला आहे का की त्याची सुरुवात कशी झाली किंवा तो का साजरा केला जातो? आज आपण जाणून घेऊयात एप्रिल फूल का साजरा केला जातो याविषयी.




**एप्रिल फूल डे कधी आणि कसा सुरू झाला?–** एप्रिल फूल डे साजरा करण्यामागे अनेक कथा आहेत. एप्रिल फूल डे साजरा करण्याची सुरुवात चॉसरच्या ‘कँटरबरी टेल्स’ मधील ‘द नन्स प्रिस्ट्स टेल’ नावाच्या कथेपासून झाली. तो काळ साधारण १३८१ सालचा होता असे म्हटले जाते. त्या काळात इंग्लंडचे राजा रिचर्ड दुसरे आणि बोहेमियाची राणी ऍनी यांच्या साखरपुड्याची घोषणा झाली.

राजाने आपल्या प्रजेला सांगितले की त्याच्या आणि राणी ऍनी यांच्या लग्नाची तारीख ३२ मार्च आहे. तिथल्या लोकांनी या सूचनेवर विश्वास ठेवला आणि राजाच्या लग्नाचा उत्सव साजरा करण्यासाठी सर्वत्र उत्साहाने तयारीला लागले. बाजारपेठा सजवल्या गेल्या. लोक तयारीत व्यस्त असताना अचानक त्यांना लक्षात आले की ३२ मार्च ही तारीखच कॅलेंडरमध्ये नाही. यानंतर सर्वांना समजले की त्यांना फसवले गेले आहे. तेव्हापासून ३१ मार्चनंतरचा हा दिवस एप्रिल फूल डे म्हणून साजरा केला जातो असे म्हटले जाते.

यानंतर एप्रिल फूल डे संपूर्ण ब्रिटनमध्ये साजरा करण्यात येऊ लागला.स्कॉटलंडमध्ये एप्रिल फूल डे दोन दिवस असतो, जिथे खोड्या करणाऱ्यांना गौक्स (कोकिळा पक्षी) म्हणतात. एप्रिल फूल डेला ‘ऑल फूल्स डे’ म्हणूनही ओळखले जाते.

**एप्रिल फूल डे कसा साजरा करावा ?–** या दिवशी लोक एकमेकांशी थट्टामस्करी करतात, विनोद करतात. बरेच लोक अशा खोड्या करतात की समोरची व्यक्ती अवाक होते. आपली मजा घेतली गेली आहे, आपल्याला गंडवण्यात आलं आहे आणि आपण मूर्ख ठरलो आहोत हेच अनेकांना समजायला वेळ लागतो. आणि एकदा समजले की मग हसून हसून त्यांची पुरेवाट लागते.

**एप्रिल फूल डेचे महत्त्व**

या दिवशी लोक मजा करतात. हा दिवस म्हणजे केवळ एकमेकांना विनोद ऐकवणे किंवा मित्रमैत्रिणी आणि नातेवाईकांची खिल्ली उडवणे इथपर्यंतच मर्यादित नाही तर यामुळे आनंद देखील पसरवला जातो.

# शेणखत वापरण्यापूर्वी यंदा करा ‘ही’ प्रक्रिया; उत्पादन वाढून मातीची राहील अबाधित सुपीकता

**दि.१विदर्भ प्रजासत्ताक**

शेणखत हे शेतात वापरण्यासाठी अत्यंत उपयुक्त असे सेंद्रिय खत आहे. मात्र त्याचा योग्य वापर केल्यावरच जास्त फायदा होतो. शेणखताचा वापर करताना ते चांगले कुजलेले असावे.

तसेच त्यात बुरशीजन्य रोग टाळण्यासाठी ट्रायकोडर्मा व्हिरिडी आणि सुडोमोनास फ्लुरोसन्स यांसारखे जैविक घटक वापरलेले असावेत. यासोबतच अर्धवट कुजलेले शेण टाकणे टाळावे. कंपोस्टिंग पद्धतीने शेणखत तयार करून वापरणे अधिक फायदेशीर ठरते.

याच अनुषंगाने आज आपण जाणून घेणार आहोत शेणखत वापरण्याच्या काही महत्त्वाच्या पद्धती तसेच शेणखत वापरतांना काय काळजी घ्यावी या विषयीची सविस्तर माहिती.

**शेणखत चांगले कुजवावे**

शेणखत शेतात टाकण्यापूर्वी ते पूर्णपणे कुजलेले असावे.

शेणखत चांगले कुजवण्यासाठी बाजारात मिळणाऱ्या कंपोस्ट कल्चरचा वापर करावा.

एक टन शेणखतासाठी १ किलो किंवा १ लिटर डी कंपोस्ट कल्चर पुरेसे असते.

**बुरशीजन्य रोग टाळण्यासाठी**

शेणखतामुळे बुरशीजन्य रोगांचा प्रसार होऊ नये म्हणून ट्रायकोडर्मा व्हिरिडी आणि सुडोमोनास फ्लुरोसन्स यांसारख्या जैविक घटकांचा वापर करावा.

यामुळे रोगप्रतिकारक क्षमता वाढते आणि पिके सुरक्षित राहतात.

**शेणकिड्यांचे नियंत्रण**

शेणखतातील कीड नियंत्रित करण्यासाठी मेटारायझियम ऍनिसोप्ली आणि बिव्हेरिया बॅसियाना या जैविक कीडनाशकांचा वापर करावा.

**प्रदूषण टाळण्याची काळजी**

गाई–म्हशींच्या शेणात कधी कधी प्लास्टिकच्या बाटल्या, इंजेक्शन सिरींज, लसीकरणाचे टाकाऊ पदार्थ, काच, प्लास्टिकचे हातमोजे यांसारखे अपशिष्ट असू शकतात.











तेव्हा हे घटक शेतात पसरू नये म्हणून शेण शेतात टाकण्यापूर्वी त्यातील हानिकारक वस्तू निवडून बाजूला काढाव्यात.


**अर्धवट कुजलेले शेणखत टाळावे**

अर्धवट कुजलेले शेणखत जमिनीत टाकल्यास उष्णता निर्माण होते ज्यामुळे उपयुक्त सूक्ष्मजीव आणि गांडुळे नष्ट होऊ शकतात.

त्यामुळे शेणखत चांगले कुजवून मग वापरावे.

**कंपोस्टिंग पद्धतीने शेणखत तयार करणे**

गोठ्यातील शेण, शेतातील कचरा आणि काडी–कचरा यांचा वापर करून दर्जेदार कंपोस्टिंग करा.



जर कंपोस्टिंग शक्य नसेल, तर शेण मोकळ्या जागेत पाणी टाकून कंपोस्ट कल्चर लावून चांगले कुजवावे.

**फळबागेत शेणखत वापरणे**

फळबागेत शेणखत वापरताना खड्डा खणून त्यात शेणखत टाकावे आणि मातीने बुजावे.

मातीच्या संपर्काने सेंद्रिय पदार्थ लवकर कुजतात.

शक्य असल्यास अशा शेणखतापासून गांडूळ खत तयार करून वापरल्यास अधिक चांगले परिणाम मिळतात.

**शेळ्या–मेंढ्यांचे लेंडी खत वापरताना सावधगिरी**

शेळ्या–मेंढ्यांच्या लेंडी खतात बाभळीच्या बिया असू शकतात.

शेळया–मेंढ्या बाभळीच्या शेंगा खातात आणि त्यांच्या विष्ठेद्वारे बिया पसरतात.

अशा खतामुळे शेतात बाभळीचे झाडे पाच– सहा वर्षे उगवत राहतात. त्यामुळे याचा वापर करताना काळजी घ्यावी.

वरील विविध माहितीचा योग्य उपयोग करून शेणखताचा योग्य वापर केल्यास शेताची उत्पादनक्षमता वाढते आणि जमिनीत पोषणतत्त्वे सुधारतात.




# रोज पनीर खाल्याने काय होते ?

**दि.१विदर्भ प्रजासत्ताक**

पनीर हे प्रथिनांनी समृद्ध आणि दुग्धजन्य पदार्थ असून त्याचे नियमित सेवन आरोग्यासाठी फायदेशीर असते. रोज योग्य प्रमाणात पनीर खाल्ल्याने शरीर निरोगी राहते, यामागचं कारण म्हणजे त्यात प्रथिने कॅल्शियम आणि इतर आवश्यक पोषक तत्वे असतात. परंतु रोज पनीर खाल्याने काय होते ? आज आपण जाणून घेऊयात रोज पनीर खाल्याने काय होते आणि हे आरोग्यासाठी चांगले आहे की नाही.



**रोज पनीर खाल्याचे फायदे आणि नुकसान**

**हाडे मजबूत होतात**

पनीरमध्ये मोठ्या प्रमाणात प्रथिने (प्रोटीन), कॅल्शियम आणि इतर आवश्यक पोषक तत्वे असतात. ज्यामुळे हाडे मजबूत होतात, स्नायूंची ताकद वाढते आणि रोगप्रतिकारशक्ती वाढते.

**कॅल्शियमचा स्रोत**

पनीरमध्ये मोठ्या प्रमाणात कॅल्शियमचे प्रमाण जास्त असते, जे हाडे आणि दात मजबूत करण्यासाठी आवश्यक आहे.

**वजन कमी करण्यास मदत**

पनीरमध्ये प्रथिने जास्त असतात, ज्यामुळे पोट भरल्यासारखे वाटते आणि जास्त खाण्याची इच्छा कमी होते, ज्यामुळे वजन कमी होण्यास मदत होते.

**हृदयविकाराचा धोका कमी करते**

पनीरमध्ये असलेले निरोगी फॅट्स कोलेस्ट्रॉलची पातळी कमी करण्यास मदत करतात, ज्यामुळे हृदयविकाराचा धोका कमी होतो.

**व्हिटॅमिन डी चा स्रोत**

पनीरमध्ये व्हिटॅमिन डी असते, जे हाडांसाठी आणि रोगप्रतिकारशक्तीसाठी आवश्यक आहे.

**जास्त प्रमाणात पनीर खाण्याचे दुष्परिणाम**

**वजन वाढू शकते**

जास्त प्रमाणात पनीर खाल्ल्याने कॅलरीज वाढू शकतात, ज्यामुळे वजन वाढू शकते.

**कोलेस्ट्रॉल वाढू शकते**

जास्त प्रमाणात पनीर खाल्ल्याने कोलेस्ट्रॉलची पातळी वाढू शकते, ज्यामुळे हृदयविकाराचा धोका वाढतो.

**उच्च रक्तदाब**

जास्त प्रमाणात पनीर खाल्ल्याने उच्च रक्तदाबाचा धोका वाढू शकतो.

# आपली सिग्नेचर ही ऑटोग्राफ मध्ये परावर्तित व्हावी!! प्र-कुलगुरू डॉक्टर महेंद्र ढोरे

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१अमरावती** – महिला महाविद्यालय , जोग चौक, अमरावतीच्या सत्र २०२३– २४ चा पदवी वितरण समारंभ दिनांक २७ मार्च २०२५ रोजी संपन्न झाला. कार्यक्रमाची सुरुवात विद्यापीठ गीत आणि महाराष्ट्र गीताने करण्यात आली .महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ . अविनाश मोहरील यांनी कार्यक्रमाला लाभलेले अध्यक्ष मा. डॉ. सुभाष कसबेकर( ज्येष्ठ उपाध्यक्ष– नू.वि. शि. मंडळ ,अमरावती), कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी मा. डॉ. महेंद्र ढोरे (प्र .–कुलगुरू संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ ,अमरावती )आणि प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित असलेल्या मा. प्रा. ममता पांडे (सहसचिव – नू.वि. शि. मंडळ, अमरावती )या सर्वांचा अल्पपरिचय करून दिला. आजच्या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून माननीय महेंद्र ढोरे लाभणे हा महाविद्यालयाचे दृष्टीने एक अत्यंत एक उत्तम योग असल्याचे माननीय प्राचार्य म्हणाले. महाविद्यालयातून पदवी धारण करणाऱ्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन आणि कौतुक करत त्यांनी उत्तुंग भरावी घ्यावी परंतु आपल्या आईहा वडील, गुरुजन आणि महाविद्यालया ला विसरू नये असे उद्गार काढले. अशा समारंभाच्या आयोजनामुळे महाविद्यालयातील इतर विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळते म्हणून विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे कौतुक होणे आवश्यक असल्याचे मत प्राचार्य डॉक्टर अविनाश मोहरील यांनी व्यक्त केले. पदवीधारकांमधील विद्यापीठातून आणि महाविद्यालयातून अनुक्रमे प्रथम, द्वितीय आणि तृतीय स्थानी येणाऱ्या एकूण २० विद्यार्थिनींना



मान्यवरांच्या हस्ते पदवी प्रमाणपत्र व मेडल देऊन सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी पदविकांक्षींना महाविद्यालयाकडून दिल्या जाणाऱ्या दीक्षांत संदेशाचे वाचन प्रा मधुरा ठाकरे यांनी केले. कार्यक्रम संपन्न झाल्यावर इतर सर्व पदवीधारकांना पदवी प्रमाणपत्र वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी प्र– कुलगुरू डॉक्टर महेंद्र ढोरे यांनीही आपल्या मनोगतात पदवी प्राप्त करणाऱ्या सर्व विद्यार्थीनींचे अभिनंदन करीत त्यांच्या उज्वल भविष्या करता शुभेच्छा दिल्या. परंतु सध्याची तरुण पिढी ही सोशल मीडियाच्या आहारी गेली असून रियल लाईफ ऐवजी रिल लाईफ जगत असल्याची खंत ही व्यक्त केली .सोशल मीडियाचा वापर करायचा असेल तर अतिशय काळजीपूर्वक व जबाबदारीने करावा जेणेकरून त्यामुळे स्वतःला व इतरांना त्याचा त्रास होणार नाही असेही मत त्यांनी यावेळी व्यक्त केले . पदवीधारकांनी उराशी बाळगलेली स्वप्न पूर्ण करण्याकरिता अथक परिश्रम करीत आपली सिग्नेचर ही ऑटोग्राफ मध्ये परावर्तित व्हावी या दिशेने मार्गक्रमण करावे अशा शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. डॉ. सुभाष कसबेकर यांनीही सर्व पदवीधारकांचे नूतन विदर्भ शिक्षण मंडळाच्या कार्यकारणीच्या वतीने मनःपूर्वक अभिनंदन आणि कौतुक केले व त्यांच्या उज्वल भविष्याकरिता शुभेच्छा दिल्या. नवीन शैक्षणिक धोरणाच्या दिशेने आपले महाविद्यालयात मार्गक्रमण करील असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. कार्यक्रमाच्या उत्तम नियोजनाकरिता माननीय प्राचार्यांचे व आयोजन समितीचे कौतुक केले. कार्यक्रमाचे संचलन प्रा. डॉ. शर्मिला देशमुख यांनी केली तर प्रा. डॉ. जयश्री वैष्णव यांनी सर्व उपस्थित मान्यवरांचे आभार मानले. प्रा. निकिता मोने हिच्या पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रमाच्या यशस्वितेकरता प्रा. सचिन देशमुख, प्रा. गोकुल देशमुख, प्रा. शंतनु भंडारजकर, प्रा. अजय महल्ले, प्रा.मीरा नवसाळकर,प्रा. सोनाली धांडे, श्री आशिष जोशी यांच्यासह सर्व सदस्यांचे सहकार्य लाभले.

RNI No. - MAHMAR 2023/84526
Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

# विदर्भ प्रजासत्ताक

मंगळवार दि. १ एप्रिल २०२५

शहर/ग्रामिण


# पिंपळविहिर येथील एका घरातून ७२ गावठी बॉम्ब जप्त

## बॉम्ब चावल्याने गाय जखमी झाल्यानंतर घबाड उघड

### नांदगावपेठ पोलिसांची कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१अमरावती,** एका माथेफिरू आरोपीने शिवारात डुक्कर पकडण्यासाठी गावठी बॉम्ब ठेवले. परंतु, गायीने तो बॉम्ब चावल्याने बॉम्ब तोंडात फाटल्याने ती गंभीर जखमी झाली. याबाबत तक्रार येताच नांदगावपेठ पोलिसांनी पिंपळविहिर येथील एका रेकार्डवरील आरोपीच्या घरावर छापा मारून तब्बल ७२ गावठी बॉम्ब जप्त केले.

किशोर भोसले, रा. पिंपळविहिर असे जखमीचे नाव आहे. माहितीनुसार, तक्रारकर्ते जुबेर खान सिराजखान (२७) रा. सावर्डी यांच्याकडे २० गायीव १५ म्हशी असून त्यांनी सर्व गुरे चराई करण्यासाठी बाल्या पवार नामक एक मजूर ठेवला आहे. २९ मार्चला सायंकाळच्या सुमारास बाल्या पवार नांदगावपेठ एमआयडीसी परिसरातील श्रॉफ कंपनी जवळील खुल्या जागेत



जुबेर खान यांची पाळीव गुरांची चराई करित होता. अशातच एका गायीने डुकरांच्या शिकारीसाठी जमिनीवर ठेवलेला गावठी बॉम्ब चावल्याने तो बॉम्ब तिच्या तोंडात फाटला. गायीचा संपूर्ण जबडा फाटल्याने बाल्या पवार याने याबाबत जुबेर खान यांना माहिती दिली. जुबेर खान हे पोलिसांसह घटनास्थळी दाखल झाले. पिंपळविहिर येथील किशोर भोसले नामक पोलिसांच्या रेकार्डवरील आरोपी हा डुकरांची शिकार करण्यासाठी जमिनीत गावठी बॉम्बठेवत असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी तात्काळ किशोर भोसलेचे घर गाठून त्याच्या घराची झडती घेतली. घरझडती दरम्यान पोलिसांना किशोरच्या घरातून तब्बल ७२ गावठी बॉम्ब मिळाल्याने संपूर्ण गावात चांगलीच खळबळ उडाली. त्यानुसार पोलिसांनी किशोरच्या घरातून सर्व ७२ गावठी बॉम्ब जप्त करून त्याच्या विरोधात नांदगावपेठ पोलिस ठाण्यात संबधीत कलमान्वे गुन्हे दाखल केले.

# नांदगाव पेठची लेक भक्ती देशमुख संसद भवन गाजवणार



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१नांदगाव पेठ**

केंद्र सरकारच्या युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्रालय व नेहरू युवा केंद्राद्वारे आयोजित 'विकसित भारत राष्ट्रीय युवा संसद-२०२५' मध्ये नांदगाव पेठ ची युवा व्याख्याता कु. भक्ती अरविंद देशमुख हिची निवड झाली आहे.दिल्लीच्या संसद भवनात १ ते ३ एप्रिल २०२५ दरम्यान ही युवा संसद संपन्न होणार आहे. या संसदेच्या प्राथमिक फेरीमध्ये देशभरातल्या ७५,००० हून अधिक तरुणांनी भाग घेतला. त्यानंतर हैदराबाद येथे जिल्हास्तरावर निवड झालेल्या १५० तरूणांमध्ये भक्तीने प्रथम स्थान प्राप्त केले. तेलंगाणामधील १३ जिल्ह्यातील प्रथम दहा युवांनी राज्यस्तरीय संसदेत सहभाग घेतला. दोन दिवस चाललेल्या या संसदेत १३० युवकांमध्ये भक्ती प्रथम आली आणि आता ती राष्ट्रीय स्तरावर तेलंगाणा राज्याचे प्रतिनिधित्व करणार आहे. ती सध्या हैदराबादच्या प्रतिष्ठित केंद्रीय विश्वविद्यालया मध्ये पीएचडी करते आहे.केंद्र सरकारचा हा उपक्रम तरुणांना राजकारण आणि सार्वजनिक धोरणांशी जोडण्यासाठी आणि प्रशासन आणि राष्ट्र उभारणीत त्यांचा सहभाग वाढविण्यासाठी एक प्रभावी व्यासपीठ म्हणून काम करतो.

१ ते ३ एप्रिल २०२५ दरम्यान होणाऱ्या या राष्ट्रीय फेरीत प्रत्येक राज्य आणि केंद्रशासित प्रदेशातील अव्वल तीन आलेले स्पर्धक 'एक देश एक निवडणूक' या विषयावर आपले विचार मांडतील, ज्यामध्ये एकूण १०५ तरुणांचा सहभाग असेल. दिल्लीच्या संसद भवनात सर्व ज्येष्ठ, श्रेष्ठ राजकारणी आणि विचारवंत यांच्यासमक्ष हे युवकांचे विचारमंथन होणार आहे.भक्ती नांदगाव पेठ येथील श्रीरामचंद्र संस्थानचे अध्यक्ष, सुप्रसिद्ध वक्ता प्राचार्य डॉ. अरविंद देशमुख यांची कन्या असून लहान वयातच आपल्या सखोल अभ्यासाने आणि प्रभावी वक्तृत्वाने तिने लोकप्रियता प्राप्त केली आहे.तिच्या या यशाबद्दल सर्व नांदगाव पेठ वासियांनी तिचे अभिनंदन केले आहे. आणि तिच्या पुढील वाटचालीकरता शुभेच्छा दिल्या आहेत.

# झेडपी आरोग्य विभागात ५० उमेदवारांच्या कागदपत्रांची पडताळणी

## वैद्यकीय अधिकारी गट-ब कंत्राटी भरती, २० जागांवर होणार नियुक्ती

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१अमरावती-** आरोग्य विभागात वैद्यकीय अधिकारी ब वर्गाच्या रिक्त असलेल्या २० जागांकरिता कंत्राटी भरती राबविली जात आहेय या अंतर्गत जिल्हा परिषदेच्या सभागृहात अर्ज करणाऱ्या ५० उमेदवारांच्या कागदपत्रांची पडताळणी करण्यात आली.

आरोग्य विभागात वैद्यकीय अधिकारी गट-ब कंत्राटी २० पदे तातडीने भरण्याकरीता आरोग्य विभागाकडून मार्च एंडींगमध्ये देखील प्रक्रिया सुरू केली आहे. या जागांकरिता उमेदवारांकडून अर्ज बोलाविले होते. डॉ. पंजाबराव देशमुख सभागृहात




जिल्हा निवड समितीने मान्यता प्रदान केलेल्या सुचिमधील ५० उमेदवारांचे सुटीच्या दिवशी सुध्दा जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुरेश असोले यांच्या मार्गदर्शनात उमेदवारांच्या मुळ कागदपत्राची पडताळणी करण्यात आली. त्याप्रमाणे पात्र वैद्यकीय अधिकारी गट-ब कंत्राटी २० पदे ही तातळीने भरण्यात येणार आहेत. सद्या मार्च एन्डींगची लगबग असून सुध्दा पदभरतीची कार्यवाही सुध्दा सुरू आहे. सदर कार्यवाहीस आर. आर. रोघे, निलीमा भांगे, विनोंद बुटे, अरुणा राठोड, प्रमोद वानखडे, दिया गजघाटे यांनी राबविली.

# 'माझी कन्या' ला ७५ लाखांचा धनलाभ

## ३०० मुलींच्या नावे होणार फिस डिपॉजिट

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१अमरावती,**

शासनाच्या माझी कन्या भाग्यश्री या बंद पडलेल्या योजनेतील रखडलेला निधी सोमवारी प्राप्त झाला. महिला व बालकल्याण विभागाला ७५ लाख रुपये प्राप्तझाले असून या योजनेतील पात्र ३०० मुलींच्या खात्यात सदरची रक्कम प्रत्येकी २५ हजार ते ५० हजारा या प्रमाणात फिक्स डिपॉजिट केली जाणार आहे.

शासनाने २०१७ मध्ये माझी कन्या भाग्यश्री ही योजना सुरू केली होती. याअंतर्गत एका मुलीला ५० हजार तर दोन मुली




असल्यास प्रत्येकी २५ हजारांचे अनुदान सदर मुलीच्या खात्यात फिक्स डिपॉजिट केले जात होते. परंतु २०२३ मध्ये या योजनेत बदल करीत लेक लाडकी योजना सुरू केली आहे. यामध्ये मुलगी १८ वर्षाची होईपर्यंत तिला विविधटण्यातनिधी दिल्या जातो. ही योजना सुरू केल्यानंतर मात्र मागील माझी कन्याचे पैसे शासनाकडे थकलेहोते. आतापर्यंत या योजनेत २ कोटी ३२ लाखांचा निधी प्राप्त झाला होता. तर या योजनेतील लाभार्थी अद्यापही वंचित असताना अखेर सोमवारी ३१ मार्च रोजी शासनाकडून महिला व बालविकास विभागाला ७५ लाखांचा निधी मिळाला आहे. यामधुन जिल्ह्यात सुमारे ३०० मुलींच्या खात्यात सदरचा निधी फिक्स डिपॉझिट केल्या जाणार आहे. मार्च एण्डिगला लक्ष्मींना धनलाभ मिळाल्याने जिल्ह्यात पालकांमध्ये दिलासा व्यक्त होत आहे.


विदर्भ प्रजासत्ताक


# आरोग्यमित्रांच्या मानधनात २१०० रूपयांची वाढ

## सहा दिवसापासून सुरू असलेले आरोग्यमित्रांचे आंदोलन स्थगित

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१अमरावती-** विविध मागण्यासाठी १७ फेब्रुवारीपासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सुरू असलेले आरोग्यमित्राचे धरणे आंदोलन नुकतेच स्थगित करण्यात आले.आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर आणि आंदोलकांची संघटना सीटूचे डॉ. डी.एल. कराड यांच्या झालेल्या चर्चामुळे हे आंदोलन स्थगित करण्यात आल्याचे जिल्हाध्यक्ष अमरदीप तायडे यांनी सांगितले.राज्याचे आरोग्य मंत्री आबिटकर यांनी आरोग्य मित्रांचे मानधन १३,९०० वरून १६ हजार रुपये करण्यास मान्यता दिली असून उर्वरित मागण्याबाबत आगामी अर्थसंकल्पीय अधिवेशनात निर्णय घेण्याचे मान्य केले आहे. सेंटर फॉर इंडियन ट्रेड युनियनच्या नेतृत्वात महाराष्ट्र आरोग्य मित्र कर्मचारी संघटनेने गेल्या सहा दिवसापूर्वी जिल्हा कचेरीवर धरणे आंदोलन सुरू केले होते. या आंदोलनामुळे आयुष्मान भारत व महात्मा फुले जनआरोग्य योजनेचे प्रस्ताव अडचणीत आले होते.त्यामुळे आरोग्यमंत्र्यांनी सकारात्मक पाऊल उचलत संघटनेशी चर्चा




केली. दरम्यान चर्चेनुसार अधिवेशनात निर्णय झाले नाहीत तर स्थगित केलेले आंदोलन पुन्हा एकदा सुरू केले जाईल, असे संघटनेचे म्हणणे आहे. महात्मा फुले जनआरोग्य योजना सोबत आयुष्मान भारतचे काम करत असतानाही या योजनेचा कोणताही मेहनताना आरोग्य मित्रांना देण्यात आला नाही. त्यांना बीएसआयसी लागू केली परंतु अद्याप कार्ड दिले नाहीत.महात्मा फुले जनआरोग्य योजनेपोटी मिळणारे मानधन तोकडे आहे, ते ३६ हजार रुपयापर्यंत वाढवून दरवर्षी त्यात दहा टक्के वाढ करावी.पाच वर्षाहून अधिक काळ सेवा देणाऱ्या आरोग्य मित्रांना उपदान देण्यात यावे, इत्यादी मागण्यासाठी हे आंदोलन पुकारले होते. सिटूचे पुढारी सुभाष पांडे, रमेश सोनुले, मुकुंद काळे यांच्यासह आरोग्य मित्र संघटनेचे जिल्हाध्यक्ष अमरदीप तायडे यांनी या आंदोलनाचे नेतृत्व केले.-

# सफाई कंत्राटाबाबत हायकोर्टात ३ ला सुनावणी

### काळ्या यादीतील दोन संस्थांना कंत्राट दिल्याचे प्रकरण

**विदर्भ प्रजासत्ताकदि.१अमरावती -** महापालिकेचे तत्कालिन आयुक्त डॉ. प्रवीण आष्टीकर यांच्या कार्यकाळात प्रभागनिहाय कंत्राट पद्धत रद्द करून झोननिहाय कंत्राट पद्धती लागू करण्याच्या निविदा प्रक्रियेला एका संघटनेने उच्च न्यायालयात आव्हान दिले होते. या याचिकेवर ३ एप्रिल रोजी उच्च न्यायालयातील - न्यायमूर्ती सांभरे यांच्या न्यायालयात सुनावणी होणार आहे.महापालिकेने काळ्या यादीतील दोन कंपन्यांना कंत्राट दिल्याचा आरोप याचिकेत करण्यात आला आहे. ज्यामध्ये गोविंदा बेरोजगार संस्था आणि क्षितिज यांचा प्रामुख्याने समावेश आहे. गोंविदाला एसटी महामंडळाने तर क्षितिज संस्थेलाअंजनगावसुर्जी नगरपरिषदेने काळ्या यादीत टाकले आहे. झोननिहाय स्वच्छता कंत्राटाच्या ज्या कंपन्यांनी निविदा भरल्या होत्या. त्यात अमरावतीच्या अशोक एंटरप्रायजेसचाही समावेश होता. परंतु अशोक एंटरप्रायझेसची निविदा महापालिके ने फेटाळल्याने या कंपनीने स्वच्छता कंत्राटाला मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात आव्हान दिले आहे.



ज्यामध्ये महापालिकेवरही आरोप करण्यात आले आहेतअमरावतीमधील खास कंत्राटदारांना फायदा व्हावा, यासाठी महापालिकेने ही कंत्राट पद्धत लागू केली. स्वच्छता कंत्राटदारांशी करार करताना झोननिहाय किती कर्मचारी असतील ? याचा कुठेही उल्लेख नव्हता. महापालिका झोन क्र. २ आणि ४ चे कंत्राट गोविंदा बेरोजगार संस्थेला देण्यात आले होते. झोन क्रमांक तीनचा कंत्राट क्षितिज संस्थेला तर १ आणि ५ चे कंत्राट श्री नागरी संस्थेला देण्यात आले आहे. ज्यामध्ये गोविंदा आणि क्षितिज या दोन्ही संस्थांना आधीच काळ्या यादीत टाकण्यात आले आहे. त्यांना कंत्राट देण्याच्या मुद्यावर उच्च न्यायालय लक्ष ठेवून आहे.विशेष म्हणजे झोननिहाय कंत्राट पद्धती राबवताना प्रत्येक झोनमध्ये किती कर्मचारी असतील हे करारनाम्यात स्पष्ट नसल्याचा फायदा कंत्राटदार घेत आहेत. त्यामुळे जवळपास सर्व २२ प्रभागांमध्ये ठिकठिकाणी कचऱ्याचे ढीग आणि नाले तुंबल्याच्या तक्रारी महापालिकेकडे आलेल्या आहेत. अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक यांनी नवीन प्रस्ताव तयार करून ५५ सफाई कामगारांची विभागनिहाय नियुक्ती करण्यासाठी महापालिका आयुक्तांकडे पाठवली होती. मात्र दरम्यान, स्वच्छता कंत्राटाचा मुद्दा उच्च न्यायालयात गेल्याने महापालिका आयुक्तांनी त्यावर कोणताही निर्णय घेतलेला नाही. प्रत्येक प्रभागात ५५ कर्मचारी नेमावेत, अशी तोंडी सूचना केवळ स्वच्छता कंत्राटदारांना देण्याब येत आहे.

# २.८४ लाख विद्यार्थ्यांची होणार 'पॅट' परीक्षा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१अमरावती** -इयत्ता तिसरी ते नववी पर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी नियतकालिक मूल्यांकन चाचणी (घंट-३) परीक्षेचे आयोजन करण्यात आले असून, यासाठी जिल्ह्यातील तब्बल २ लाख ८४ हजार ८०७ विद्यार्थी प्रवेशित झाले आहेत.

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेकडून वा परीक्षेच्या आयोजनाबाबत शिक्षण विभागाला मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या आहेत. शासकीय, खासगी व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सर्व माध्यमांच्या शाळांमध्ये ही परीक्षा



बंधनकारक असून, याद्वारे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेचे मूल्यमापन केले जाते. पायाभूत चाचणी, संकलित मूल्यमापन चाचणी १ व २ अशाप्रकारे तीन चाचण्या यामध्ये घेतल्या जातात. या परीक्षा ८ ते २५ एप्रिलदरम्यान आयोजित करण्यात आल्या आहेत. यामध्ये इंग्रजी, हिंदी, उर्दू व मराठी अशा चारही माध्यमांमधील एकूण २ लाख ८४ हजार ८०७ विद्यार्थी प्रवेशित आहे. त्यामध्ये इयत्ता तिसरीचे ४१ हजार १७४,इयत्ता चौथीचे ४१ हजार ४८५, इयत्ता पाचवीचे ३८ हजार ४९७, इयत्ता सहावीचे ३७ हजार ५२, सातवीचे ३८ हजार ६७०, इयत्ता आठवीचे ४४ हजार ३४५ व इयत्ता नववीचेही ४४ हजार ३४४ विद्यार्थ्यांचा समावेश आहे. या परीक्षेच्या अनुषंगाने जिल्हा परिषद व महापालिकेच्या शिक्षणविभागाकडून संबंधित सर्व शाळांना सूचना देण्यात आल्या आहेत.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कडून अमरावतीच्या नावेदला मिळाली ईदी


## कॅंसर सोबत लढणाऱ्या तरुणाला 30 लाख रुपयांची मदत

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१अमरावती -** अमरावतीतील २३ वर्षीय नावेद अब्दुल नईम या तरुणासाठीयंदाची ईद एक नवीन आशा घेऊन आली आहे. गेल्या काही वर्षांपासून तो ब्लड कॅन्सरशी (तीव्र लिम्फोब्लास्टिक ल्युकेमिया) लढतोय. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संवेदनशीलतेमुळे आणि मुख्यमंत्री सहायता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक यांच्या तत्परतेने नावेदवर मुंबईतील कोकिलाबेन धीरुभाई अंबानी हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू झाले असून, त्याच्या प्रकृतीत हळूहळू सुधारणा होत आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मदतीचा हात पुढे न केला असता, तर कदाचित मी आज हसत बोलत आपल्यासमोर उभा राहू शकलो नसतो. त्यांनी आम्हाला खरी ईदी दिली असे भावनिक उद्गार रावेदने काढले.

२०२३ मध्ये पहिल्यांदा निदान झालेल्या या आजाराने पुन्हा डोके वर काढल्याने नावेदच्या कटुंबावर मोठे संकट आले. त्याच्या वडिलांचीआर्थिक परिस्थिती बेताची असून, ते अमरावतीतील एका कापड दुकानात काम करतात. तीन मुलींचे शिक्षण आणि संपूर्ण कुटुंबाची जबाबदारी पार पाडत असताना नावेदच्या उपचारासाठी आवश्यक असलेले ३० ते ३५ लाख रुपये उभे करणे त्यांना अशक्यप्राय होते. उपचारासाठी लागणार्या खर्चाची रक्कम ऐकून




कुटुंबियांच्या पायाखालची जमीनच सरकली. त्यानंतर नावेदच्या वडिलांनी अमरावतीचे आमदारसंजय खोडके व सुलभा खोडके यांच्याकडे धाव घेतली. आमदारांनी परिस्थिती समजून घेत, त्यांना मुख्यमंत्री सहायता निधीतून मदत मिळवण्यासाठी मार्गदर्शन केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संवेदनशील दृष्टिकोनामुळे नावेदला तातडीने मदत मिळाली. मुख्यमंत्री सहायता निधीतून २ लाख रुपये, टाटा ट्रस्टकडून १५ लाख रुपये, तर उर्वरित रक्कम धर्मादाय रुग्णालयाच्या मदतीतून कोकिलाबेन हॉस्पिटल आणि काही प्रमाणात सिद्धिविनायक ट्रस्टकडून मिळाली. या मदतीमुळे नावेदच्या उपचारांचा मार्ग सुकर झाला. मुंबईतील कोकिलाबेन हॉस्पिटलमध्ये नावेदवर अत्याधुनिक उपचार सुरू करण्यात आले आहेत. सध्या नावेदवर मिनी हायपर सीव्हीएडी किमोथेरपी आणि इतर औषधोपचार सुरू आहेत. त्याच्या २१ वर्षीय बहिणीची एचएलए जुळणी झाल्याने ती दाता म्हणून पात्र ठरली आहे. ४ एप्रिल रोजी तिच्या स्टेम सेल्स नावेदच्या शरीरात प्रत्यारोपित करण्यात येणार आहेत.

ग्रामीण पोलिस अधीक्षकांचा पुढाकार

# वीज देयकांची थकबाकी शून्य करुन हजारो रुपयांच्या व्याजापासून केली बचत

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१अमरावती–** वीज ही आज मूलभूत गरज बनलेली आहे तथापि दरमहा त्याचे बिल भरावे लागते. बिल न भरल्यास विलंब आकार आणि संचित थकबाकी वर व्याज द्यावे लागते.अमरावती जिल्ह्यामध्ये ठिक ठिकाणी ग्रामीण पोलीस कार्यालये आहेत परंतू योग्य नियोजनाअभावी दरमहा वेगवेगळ्या कार्यालयांचे वीज बिल भरणे रखडत असल्याने वीज बिलाची थकबाकी वाढत होती तसेच सदर थकबाकीवर विलंब शुल्क आणि व्याजही भरावे लागत होते. या समस्येवर अमरावती ग्रामीण पोलिस अधीक्षक विशाल आनंद सिंगोरी (आयपीएस) यांनी तत्काळ नियोजन आणि उपाययोजना करण्याचे निर्देश दिल्यानंतर जिल्ह्यातील सर्व ग्रामीण पोलिस कार्यालयाशी संबंधित ४२ लाख रूपयांच्या वीज बिलांचे योग्य नियोजन करून व दोन टप्प्यात भरणा करून मार्च २५ पर्यंतच्या वीजबिलाची थकबाकी शुन्य केली आहे.



जिल्ह्यातील ग्रामीण पोलिस कार्यालयाशी संबंधित पोलीस चौकी,ठाणे,अधीक्षक कार्यालय यांना दरमहा ४ ते ५ लाख रूपयाचे वीज बिल येते. परंतू सर्व कार्यालयाचे वीज बिल नियमित आणि एकत्रितरित्या पोलिस अधीक्षक कार्यालयात पोहचत नसल्याने सदर बिले एकत्रितपणे भरण्यामध्ये अडचणी येत होत्या. परिणामी त्याचे रूपांतर ४० लाख रूपयाच्या थकबाकीत झाले. परंतू थकबाकीमुळे विनाकारण विलंब शुल्क आणि व्याज यांचा भुरदंड पडत असल्याचे लक्षात आल्यानंतर ग्रामीण पोलीस अधीक्षकांनी त्याची गंभीरतेने दखल घेत अधिनस्त कार्यालयातील सर्व वीज बिले एकत्रित रित्या भरण्याबाबत उपाययोजना करण्याचे निर्देश सूरज बोंडे पोलीस उपअधिक्षक यांना दिले.

त्यानंतर कार्यालय अधीक्षक ज्योती आखरे यांनी कनिष्ठ श्रेणी लिपिक राजेश टेंभुर्णे व पंकज रेलकर यांच्या सहकार्याने जिल्हास्तरावरील बिलांची एकत्रित माहिती महावितरण अमरावती मंडळ कार्यालयाचे उच्चस्तर लिपिक प्रीतेश पाटकर यांच्याकडून व्यवस्थापक वित्त व लेखा विकास बांबल यांच्या मार्गदर्शनात उपलब्ध असलेल्या निधीनुसार तयार करून घेतली. त्यामुळे जिल्ह्यातील ग्रामीण पोलिस स्टेशन, चौकी यांची देयके उपलब्ध असलेल्या निधीनुसार नियमित निघत गेली, मंजूर होऊन त्याचा भरणा होत गेला व त्याचा परिणाम म्हणून मार्च महिना संपण्यापूर्वीच जिल्ह्यातील ग्रामीण पोलिस स्टेशन/चौकी/शाखा यांची थकबाकी शून्यावर आल्याने व्याजापोटी भराव्या लागणाऱ्या हजारो रूपयाची बचत झाली.

मार्च महिना आर्थीक वर्षाचा अंतिम महिना असल्याने संपूर्ण वर्षाचा ताळेबंद करण्याचा महिना असल्यामुळे महावितरणचे अधिकारी,अभियंते व कर्मचारी प्रत्येक थकबाकीदार वीज ग्राहकाच्या दारी जात आहेत. पोलिस अधिक्षक विशाल आनंद सिंगोरी (आयपीएस) यांनी जिल्ह्यातील ग्रामीण पोलिस कार्यालयाच्या वीज बिलाची थकबाकी शुन्य करण्याकरता घेतलेल्या पुढाकाराबद्दल आणि केलेल्या सत्वर कार्यवाहीबद्दल अधीक्षक अभियंता दिपक देवहाते यांनी आभार व्यक्त केले.

# निरक्षरांच्या परीक्षेत १३९६८ आजी-आजोबा उत्तीर्ण, आता अंगठ्याऐवजी करणार सही

## २५२ झाले नापास



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१अमरावती**

केंद्र पुरस्कृत नवभारत साक्षरता कार्यक्रमाअंतर्गत नुकत्याच झालेल्या परीक्षेचा निकाल घोषित झाला असून १४,२२० नवसाक्षरांपैकी १३ हजार ९६८ उर्तीण झाले आहे. फक्त २५२ निरक्षर नापास झाल्याने त्यांना पुन्हा परीक्षेला बसविण्यात येणार असल्याचे शिक्षण विभागाकडून सांगण्यात आले. जिल्ह्यातील १ हजार ८१ केंद्रावर निरक्षरांची परीक्षा घेण्यात आली होती. या परीक्षेकरिता शिक्षण विभागाकडून संपूर्ण तयारी करण्यात आली होती. जिल्ह्यात सर्वेक्षण करुन १४ हजार २२० आजी आजोबा, काका-काकूंना परीक्षेला बसविण्यात आले. त्यापैकी १४ हजार १३३ निरक्षरांनी परीक्षेला हजेरी लावली. नुकत्याच झालेल्या या परीक्षेचा निकाल रविवारी घोषित करण्यात आला. त्यामध्ये १३ हजार ९६८ निरक्षर उत्तीर्ण झाले असून त्यांनी आता डाव्या अंगठ्याची निशानी पुसून काढली आहे.आता ते स्वतः स्वाक्षरी करु शकतील. त्यामध्ये ९७४४ महिला विद्यार्थी तर ४२२४ पुरुष विद्यार्थी आहेत. यांना आता कुणीही निरक्षर म्हणू शकणार नाही. आतापर्यंत शासकीय कागदापत्रासह अन्य कामाकाजात अंगठा लावणारे आजी आजोबा, काका- काकू सह्या करु शकतील.

### १७ गुण मिळविण्यातही अपयशी

दीडशे गुणांच्या या परीक्षेत वाचन, लेखन आणि संख्याज्ञान या घटकांवर प्रत्येकी ५० गुणांचे प्रश्न होते. त्यामुळे प्रत्येक पेपरमध्ये उर्तीण होण्याकरिता १७ गुणांची आवश्यकता होती. १४ हजार १३३ विद्यार्थ्यांपैकी २५२ विद्यार्थी १७ गुण मिळवू शकले नाहीत. त्यामुळे त्यांना नापास करण्यात आले असून आता त्यांना पुन्हा परीक्षा द्यावी लागणार आहे. नापास झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये १८७ महिला तर ६५ पुरुष निरक्षरांचा समावेश आहे.

शिक्षण विभागाच्या नवभारत साक्षरता योजनेच्या माध्यमातून जिल्ह्यात निरक्षरांना साक्षर करण्याची मोहिम हाती घेतली आहे. गत तीन वर्षापासून जिल्ह्यात हा उपक्रम राबविला जात असून यावर्षी १३ हजार ९६८ निरक्षरांना साक्षर करता आले. आता पुन्हा निरक्षरांचे सर्वेक्षण होणार आहे. त्यामध्ये नापास झालेलेसुध्दा पुन्हा परीक्षेला बसतील.

**अरविंद माहोरे, शिक्षणाधिकारी योजना.**

# आरटीईकडे पालकांची पाठ, प्रवेशासाठी आज शेवटचा दिवस अजूनही सातशे जागा रिक्त

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१अमरावती–** शिक्षण हक्क कायद्यांतर्गत (आरटीई) खासगी शाळांमध्ये राखीव असणाऱ्या २५ टक्के जागांवर जिल्ह्यातील १ हजार ६५५ बालकांचे शाळांमध्ये प्रवेश निश्चित झाल्याने, प्रवेशाच्या रिक्त जागांवर प्रतीक्षा यादीतील मुलांना संधी देण्यात येत आहे. १ एप्रिलपर्यंत बालकांना प्रवेश घ्यायचे आहे. सुमारे सातशेपेक्षा अधिक जागा अद्यापही रिक्त आहेत. याशिवाय सव्र्हर डाऊन असल्याने पोर्टल स्लो आहे. दुसरीकडे पाल्यांच्या प्रवेशाकरिता पालकांनी पाठ फिरविल्याचे चित्र सध्या पाहायला मिळत आहे.

शैक्षणिक सत्र २०२५-२६ या शैक्षणिक वर्षाच्या शिक्षण हक्क अधिनियमानुसार दुर्बल व वंचित घटकातील २५ टक्के ऑनलाइन




प्रवेश प्रक्रियेची पहिल्या सोडतीतील प्रवेशाची प्रक्रिया १० मार्चपर्यंतराबविण्यात आली. दरम्यान, निवड यादीतील प्रवेशाची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर १८ मार्चपासून प्रतीक्षा यादीतील टप्पा क्र. १ मधील विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आलेली आहे. यासाठी प्रतीक्षा यादीतील बालकांच्या पालकांना प्रवेशाबाबतचे एसएमएस पाठविण्यात येत आहेत. त्यानुसार प्रवेशास पात्र ठरलेल्या पाल्याचे प्रवेश संबंधित निश्चितीसाठी पडताळणी समितीकडे आवश्यक कागदपत्रे घेऊन आपल्या बालकांचे प्रवेश शाळेत जाऊन १८ ते २४ मार्चपर्यंत निश्चित करावयाचे होते. मात्र, पुन्हा प्रतीक्षा यादीतील बालकांना प्रवेशाकरिता १ एप्रिलपर्यंत मुदतवाढदिली आहे. मात्र, प्रतीक्षा यादीत आपल्या पाल्यांचे प्रवेश घेण्यासाठी पालकांनी पाठ फिरविली आहे.-

# छत्री तलाव भानखेडा रोडवर पाणपोईचे आ. रवि राणा यांच्या हस्ते उद्घाटन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१भानखेडा** - एक कदम मानवता की ओर या अभियानाअंतर्गत उन्हाळ्याच्या दिवसामध्ये जाणाऱ्या येणाऱ्या नागरिकांना पिण्याच्या पाण्याची सोय व्हावी. याकरिता छत्री तलाव भानखेडा रोडवर पाणपोईचे उद्घाटन आ. रवि राणा यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच उन्हाळ्याच्या दिवसात पक्षांना सुद्धा पिण्याच्या पाण्याची सोय व्हावी व त्यांना चांगल्या पद्धतीने पाणी पिता यावे. व्याकरिता प्रत्येक झाडाला आ. रवि राणा यांनी जलपात्र बांधले तसेच उपस्थित कार्यकर्त्यांना सुद्धा जलपात्राचे




वितरण करत छत्री तलावभानखेडा रोडवरील दोन्ही बाजुने जलपात्र बांधण्याचे सुद्धा निर्देश दिले. तसेच दरवर्षी एक कदम मानवता की ओर ही भुमिका ठेवुन पशु पक्षी दाना पाणी अभियान या संस्थेचे संचालक महेश मुलचंदानी व त्यांच्या सर्व कार्यकर्त्यांचे यावेळी कौतुक केले. प्रत्येकाने उन्हाळयाच्या दिवसामध्ये जागोजागी जंगलाच्या रस्त्याने नागरिकांकरिता व पशु पक्षांकरिता पिण्याच्या पाण्याची सोय करावी असा संदेश सुद्धा दिला. यावेळी रमेशलाल पंजाबी, अभिषेक पंजाबी, रविपंजाबी, दिनेश सेठिया, कौशिक अग्रवाल, महेश मुलचंदानी, वैभव बजाज, मुकेश पंजाबी, जय पंजाबी, राहुल बजाज, रितेश मेहता, महेंद्र टुंडियाल, अंकुश गोयनका, शुभम उंबरकर, विक्रम शादी, अश्विन डेमला यांच्यासह शेकडो नागरिक उपस्थित होते.

# साई संस्थान भक्तांना देणार पाच लाखापर्यंतचे विमा संरक्षण, वेबसाईटवर नोंदणी करणे बंधनकारक

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३१ शिर्डी–** शिर्डी येथे साईबाबांच्या दर्शनासाठी दरवर्षी देशभरातून लाखो भाविक येत असतात. मात्र, अनेक वेळा दर्शनासाठी येताना किंवा परत जात असताना भाविकांना छोट्या-मोठ्या दुर्घटनांना सामोरे जावे लागते. या पार्श्वभूमीवर साई संस्थानने गुढी पाडव्याच्या दिवशी साईभक्तांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने एक महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. आता साईभक्तांना पाच लाख रुपयांपर्यंत विमा संरक्षण देण्याचा निर्णय शिर्डीतील साई संस्थानच्या वतीने घेण्यात आला आहे.



या विमा संरक्षणाचा लाभ घेण्यासाठी साई भक्तांना दर्शनाला येण्याआगोदर साई संस्थानच्या अधिकृत वेबसाईटवर आपली नोंदणी करणे बंधनकारक आहे. घरातून निघाल्यानंतर ते साई मंदिरात दर्शन घेईपर्यंत कोणतीही अप्रिय घटना घडल्यास संबंधित व्यक्तीला किंवा त्याच्या कुटुंबाला पाच लाख रुपयांपर्यंत विमा संरक्षण दिले जाणार आहे. याबाबत साई संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांनी सविस्तर माहिती दिली आहे.

### संस्थानची ऑनलाईन वेबसाईटवर नोंदणी करणे आवश्यक

साई संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांनी म्हटले की, जो भक्त साईबाबांच्या दर्शनासाठी येणार आहे, त्याच्यासाठी पाच लाखांचा विमा उतरवण्याचा निर्णय आम्ही घेतला आहे. त्यात अट अशी आहे की, जो भक्त साईबाबांच्या दर्शनासाठी येईल, त्यांनी दर्शनाला निघण्यापूर्वी साईबाबा संस्थानची ऑनलाईन वेबसाईटवर नोंदणी करणे आवश्यक आहे. यामुळे भक्त साईबाबांच्या दर्शनासाठीच येत आहे, याची ओळख पटण्यास मदत होईल. जे फक्त नोंदणी करून येतील, त्यांचा विमा उतरवला जाणार आहे. सर्व साई भक्तांना यानिमित्त मी विनंती करत आहे की, आपण निघण्यापूर्वी साईबाबा संस्थानच्या ऑनलाईन वेबसाईटवर नोंदणी करावी, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

# श्रीराम मंदिर संस्थानच्या वतीने श्रीराम नवमी उत्सवाला प्रारंभ

## हनुमान जयंतीपर्यंत विविध धार्मिक कार्यक्रम, ६ ला महाप्रसाद

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३१ टाकरखेडा संभू** - श्रीराम मंदिर संस्थान मध्ये श्रीराम नवमी महोत्सवाचे आयोजन केले आहे. रविवारी ३० मार्चला गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर या महोत्सवाला सुरुवात झाली. ६ एप्रिलपर्यंत चालणार्या या महोत्सवांत विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांची रेलचेल राहणार आहे. ६ एप्रिलला महाप्रसाद व श्रीराम नवमी जन्मोत्सव साजरा केला जाणार आहे.या महोत्सवाची सुरुवात गुढी पाडव्याला सकाळी ५ वा. श्रीराम अभिषेक, पुजन व काकडा आरतीने केली. त्यानंतर सकाळी ७ वाजता तीर्थ स्थापना व गुढीपूजन केले. सकाळी ८ वा नवीन पताका ध्वजारोहण तर दुपारी १२ वा. श्रीरामचरीत मानस नव्हाण्न पारायणला प्रारंभ झाला. सायंकाळी सात वाजता आरती, भजन झाले. या महोत्सवांतर्गत कार्यक्रमांमध्ये रोज सकाळी पाच वाजता श्रीराम अभिषेक पूजन व काकड आरती होणार आहे. याशिवाय सोमवारी ३१ मार्चला रात्री आठ वाजता शेतकरी मेळाव्यात (चिया पीक लागवड व विक्री व्यवस्थापन) डॉ. डी. एन. इंगोले कृषी अर्थशास्त्रज्ञ जिल्हा वाशीम हे शेतकर्यांना कृषी



विभाग भातकुली तालुका यांच्या उपस्थितीत मार्गदर्शन करणार आहे.१ एप्रिल पासून विविध कार्यक्रम १ एप्रिलला सायंकाळी आठ वाजता सुंदरकांड पारायण, बुधवारी २ ला सकाळी ११ वाजता रोग निदान शिबिर, गुरूवार ३ एप्रिलला योग शिबिर, शुक्रवारी ४ एप्रिलला रात्री आठ वाजता भजन संध्या, शनिवारी ५ एप्रिलला रात्री आठ वाजता अवधूत भजन, रविवार, ६ एप्रिलला दुपारी १० वाजता श्रीराम जन्मोत्सव व काल्याचे कीर्तन होईल. त्यानंतर १२ वाजता श्रीराम जन्मानंतर महाप्रसादचे आयोजन केले आहे. हनुमान जयंतीनिमित्त १२ एप्रिलला श्रीराम आणि हनुमानजी अभिषेक, पूजा, काकडा आरती सकाळी ६ वाजता श्री. हनुमान जन्मोत्सव आयोजित केला आहे.

# जिल्ह्यात आज पावसाचा अंदाज

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१अमरावती–** हवामान विभागाने अवकाळी पावसाचा अंदाज वर्तविला असून, जिल्ह्यात मंगळवारी (ता. एक) व बुधवारी (ता. दोन) या दोन दिवशी



बिजांच्या कडकडाटांसह तुरळक पाऊस पडण्याची शक्यता आहे. पश्चिमी चक्रवाताचा परिणाम म्हणून संपूर्ण राज्यात अवकाळी पावसाचा इशारा हवामान विभागाने दिला आहे. सोमवारी दुपारपासून आकाशात काळे ढग जमल्याने उन्हाचा तडाखा काही प्रमाणात कमी झाला होता. मंगळवारी काही भागांत तुरळक, तर काही भागांत विजांच्या कडकडाटासह पाऊस पडण्याची शक्यता आहे. त्यामुळे प्रामुख्याने शेतकऱ्यांनी आपापल्या शेतमालाची काळजी घेण्याचे आवाहनही करण्यात आले आहे.

# विना परवानगी २ झाडे कापली; ४० हजारांचा दंड

**विदर्भ प्रजासत्ताकदि.१अमरावती–** झोन क्र. २ राजापेठ अंतर्गत येणाऱ्या दस्तूरनगर चौकात नालीच्या बांधकामासाठी अडथळा ठरणारे कडूनिंब व पेल्ट्राफ्रॉम असे दोन वृक्ष कंत्राटदाराने वृक्ष प्राधिकरणाची परवानगी न घेताच कापले. त्यामुळे या कंत्राटदाराला प्रतिवृक्ष २० हजार रुपये असा एकूण ४० हजार रुपये दंड केला.सामाजिक कार्यकर्ते प्रदीप पाटील यांना सुस्थितीत असलेल्या वृक्षांची संबंधित कंत्राटदाराकडून कत्तल करण्यात आल्याचे दिसल्यानंतर त्यांनी तत्काळ मनपा आयुक्त सचिन कलंत्रे यांच्याकडे तक्रार दिली. मनपा आयुक्तांनीही गंभीर दखल घेत उद्यान विभागाला या प्रकरणी तपासणी करण्याचे निर्देश दिले. उद्यान अधीक्षक श्रीकांत गिरी यांच्या आदेशाने उद्यान विभागातील कर्मचाऱ्यांनी स्थळाचे निरीक्षण केले असता त्यांना दोन वृक्ष अनधिकृतपणे कापण्यात आल्याचे आढळले. त्यांनी यासंदर्भातील अहवाल मनपा आयुक्तांकडे सोपवल्यानंतर मनपा आयुक्तांनी या प्रकरणी वृक्ष प्राधिकरणाकडे प्रकरण सोपवले. वृक्ष प्राधिकरणानेही पूर्ण तपास केल्यानंतर त्यांनाही या प्रकरणी कंत्राटदार दोषी आढळल्याने त्यांनी कंत्राटदाराला दोन झाडे विना परवानगी कापल्यामुळे एकूण ४० हजाराचा दंड ठोठावला आहे.

संबंधित कंत्राटदाराने वृक्ष तोडण्यासाठी प्राधिकरणाकडे परवानगी मागितली होती. मात्र, परवानगी मिळण्याच्या आधीच त्यांनी दोन वृक्ष हकनाक कापले. कदाचित मनपाचेच काम असल्याने आपल्याला परवानगी मिळेलच या विचारात दोन वृक्ष कापण्यात आले. मात्र परवानगी मिळाली नाही.

# विदर्भ पंढरीत रामनवमी उत्सवाला उत्साहात प्रारंभ

## नवीन वर्षा निमित्त भाविकांची मांदियाळी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३१बुलढाणा–** विदर्भ पंढरी शेगाव येथे दरवर्षीप्रमाणे यावर्षीही श्रीराम नवमी उत्सवाला पारंपरिक उत्साहात आणिविविध धार्मिक कार्यक्रमानी प्रारंभ झाला. दरम्यान मराठी पंचांगा नुसार नवीन वर्षांच्या पहिल्या दिवशी गुढीपाडव्याला माउलींच्या दर्शनासाठी राज्यातील भाविकांची शेगाव नगरीत मंदियाळी जमल्याचे दिसून आले.संत गजानन महाराज संस्थांनाचा मोठा उत्सव असलेल्या राम नवमी उत्सवास विविध धार्मिक कार्यक्रमांनी भक्तीमय वातावरणात प्रारंभ झाला. यामध्ये दररोज मंदिरामध्ये सकाळी ६ ते ६.४५ वाजे दरम्यान काकडा , ७.१५ ते ९.१५ भजन, दुपारी ४ ते ५ प्रवचन, सायंकाळी ५.१५ ते ६ हरिपाठ व रात्री ८ ते १० पर्यंत महाराष्ट्रातील नामवंत महाराजांचे श्रीहरी कीर्तन असे दैनंदिन धार्मिक राहणार आहे. ३० मार्च रविवार ते पासून ६ एप्रिल रविवार पर्यंत सप्ताहभर पार पडतील. रविवारी ३० मार्च रोजी श्रीहरी कीर्तन ह भ प भाऊराव बुवा



सुशिर श्री क्षेत्र मुक्ताईनगर यांचे श्रीहरी कीर्तन रात्री ८ ते १० दरम्यान पार पडले . आज सोमवार ३१ मार्चला ह भ प ज्ञानेश्वर बुवा काकडे मु हावरगांव यांचे कीर्तन होईल, मंगळवार, १ एप्रिल रोजी ह भ प पोपट बुवा फरकाडे छत्रपती संभाजीनगर, बुधवार २ एप्रिल रोजी ह भ प बळीराम बुवा दौंड मु .शिवर , गुरुवार ३ एप्रिल रोजी ह भ प ज्ञानेश्वर बुवा बेलदारवाडीकर बेलदारवाडी , शुक्रवार ४ एप्रिल रोजी ह भ प सोपान बुवा सानप (शास्त्री) हिंगोली , शनिवार ५ एप्रिल रोजी ह भ प भगीरथ बुवा काळे नाशिक यांचे कीर्तन पार पडणार आहे ६ रविवार चैत्र शुद्ध ९ श्रीराम नवमीदिनी ह भ प श्रीराम बुवा ठाकूर लातूर यांचे सकाळी १० ते १२ यावेळेत 'श्रीराम जन्मोत्सवाचे' किर्तन होईल.

राम नवमीला नगर परिक्रमा २ एप्रिल पासून अध्यात्म रामायण स्वाहाकार यज्ञास आरंभ होणार आहे. श्रीराम नवमी उत्सव निमित्त अध्यात्म रामायण स्वाहाकारास यज्ञास चैत्र शु ५ बुधवार २ एप्रिल ला आरंभ होईल. चैत्र शु ९ रविवार ६ एप्रिल श्रीराम नवमीदिनी सकाळी १० वाजता यज्ञाची पुर्णाहुती व अवभृतस्नान होईल. तद्नंतर श्रींच्या मंदिर परिसरातून दुपारी श्रीराम नवमी उत्सवा निमित्त श्रींची पालखी रथ ,अश्वासह , पताकाधारी टाळकरी व वारकरी टाळ मृदुंगाच्या निनादात व हरिनामाच्या गजरात पालखी परिक्रमाकरिता निघेल.

# तुमच्या ही भागातील पाणी दूषित आहे का? ग्रामीण भागात ७३ ठिकाणचे पाणी नमुने आले दूषित

## ३ हजार १९९ नमुन्यांची तपासणी,क्लोरिनचा वापर कमी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१अमरावती**

प्रत्येक ग्रामपंचायतीने गावाला शुद्ध पाणीपुरवठा करणे अपेक्षित असते. मात्र, ग्रामीण भागातील १५ तालुक्यांमधून ७३ ठिकाणचे पाणी दूषित असल्याचे तपासणीत समोर आले आहे. यामुळे संबंधित ग्रामपंचायतींना पाणी नमुन्यात क्लोरिनचा २० टक्क्यांपेक्षा कमी वापर केल्याचे निदर्शनास आले. क्लोरिनचा कमी वापर केल्याने हे पाणी पिण्यास अयोग्य ठरले आहे.

संबंधित ग्रामपंचायतींनी पाणी शुद्धीकरणाकडे दुर्लक्ष केल्याचे स्पष्ट झाले आहे, तर तपासणी केलेल्या ३ हजार १९९ नमुन्यांपैकी ग्रामीण भागातील ७३ जलस्रोतांचे पाणी दूषित (३.०९ टक्के) पाणी दूषित आढळले आहे.



### दूषित नमुने असलेल्या ग्रामपंचायतींना नोटीस

ज्या ग्रामपंचायत क्षेत्रातील जलस्रोतांचे पाणी नमुने दूषित आले. त्या ग्रामपंचायतींना नोटीस बजावून पाणी शुद्धीकरणाबाबत आवश्यक उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या जातात. याशिवाय तेथील पाण्याचे सुपर क्लोरिनेशन केले जाते. पुन्हा पाणी नमुने घेऊन पाणी पिण्यास योग्य असल्यास तसे कळवले जाते.

**–डॉ. सुरेश आसोले, डीएचओ**

जिल्हा परिषद आरोग्य विभाग जिल्ह्यातील जलस्रोतांची अणुजैविक तपासणी करते. या अंतर्गत प्रत्येक जलस्रोतांचे दरमहा जलसुरक्षा रक्षकामार्फत नमुने गोळा करून ते तपासणीकरिता जिल्हा प्रयोगशाळेत पाठवले जातात. जल शुद्धीकरण करताना यात क्लोरिन वापराचे प्रमाण ३३ टक्के अपेक्षित आहे. मात्र, ३३ टक्क्यांपेक्षा कमी क्लोरिनचा वापर केल्यास ते पाणी शुद्धीकरण योग्य पद्धतीने केले जात नाही. असा निष्कर्ष काढण्यात येतो. जिल्हा प्रयोगशाळेत पाणी नमुन्यांची तपासणी केल केल्यानंतर दूषित नमुन्यांबाबत आरोग्य विभागाला प्राप्त झालेल्या अहवालानुसार दूषित पाण्याबाबत संबंधित ग्रामपंचायतींना आरोग्य विभागाकडून नोटीसबजावून तत्काळ पाणी शुद्धीकरण करून पाणी पुरवठा करण्याचे निर्देश आरोग्य विभागाकडून संबंधित पंचायत समितीमार्फत देण्यात आले आहेत. फेब्रुवारी २०२५ च्या अहवालानुसार ग्रामीण भागातील २ हजार २३९१ पाणी नमुन्याची तपासणी केली आहे. याशिवाय शहरी भागातील ८०८ असे मिळून ३ हजार १९९ पाणी नमुने तपासले आहेत. यामध्ये ग्रामीण भागात ७३ तर शहरी भागात ५१ जलस्रोतांचे पाणी पिण्यास अयोग्य असल्याचे समोर आले.

# श्रोत्यांनी लुटला 'मिर्झा एक्स्प्रेस' हास्य महोत्सवाचा मनमुराद आनंद

## उत्कृष्ट समाजकार्य करणाऱ्यांचाही धामणगावात केला सत्कार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१धा.रेल्वे**

गुढीपाडव्यानिमित्त प्रसिद्ध हास्य कलाकार डॉ. मिर्झा रफी अहमद बेग यांच्या 'मिर्झा एक्स्प्रेस' या विनोदी कार्यक्रमाने हजारो श्रोत्यांना हसवले. हा कार्यक्रम अहिल्याबाई बहुउद्देशीय संस्थेद्वारे स्व. दादाराव अडसड हॉलीबॉल मैदान, भागचंद नगर येथे उत्साहात पार पडला.



कार्यक्रमाची सुरुवात श्रीहरी भक्त मंडळाच्या भजनांनी आणि 'द आर्टिस्ट म्युझिकल ग्रुप' व 'कराओके क्लब'च्या सुमधूर गीतांनी झाली. सुरेश ठाकरे यांनी स्वागत गीत सादर केले. यानंतर बंजारा तांड्याच्या वसंत राठोड यांच्या मार्गदर्शनात विद्यार्थिनींनी मनमोहक बंजारा नृत्य सादर केले.

या वेळी आ. प्रताप अडसड यांच्या हस्ते दीप प्रज्वलनाने कार्यक्रमाचे उद्घाटन झाले. तसेच समाजसेवेत उत्कृष्ट कार्य करणाऱ्या व्यक्तींचा सन्मान करण्यात आला. यामध्ये सुभाष कुचेरिया, सूरज मेश्राम, सचिन करडे, ड. चेतन परडखे यांचा समावेश होता.

हास्य–काव्य विनोदातील एक अग्रगण्य नाव असलेल्या डॉ. मिर्झा रफी अहमद बेग यांनी आपल्या खास शैलीत विनोदी कविता, किस्से आणि चुटकुल्यांनी उपस्थित प्रेक्षकांना मनमुराद हसवले. त्यांचा मिर्झा एक्स्प्रेस हा कार्यक्रम विनोद आणि सामाजिक संदेश यांचा सुरेख संगम होता. बेग यांनी आपल्या शब्दकलेच्या जोरावर हलक्या–फुलक्या विनोदांतून सामाजिक प्रश्नांवर मार्मिक भाष्य केले. त्यांच्या सादरीकरणामुळे उपस्थित नागरिक हसून–हसून लोटपोट झाले.

या सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून सच्चिदानंद काळे अध्यक्ष, विदर्भ साहित्य संघ, विनोद तलवारे नगरसेवक, गिरीश ताथोड ठाणेदार दत्तापूर, डॉ. रूपेश खडसे विदर्भ अध्यक्ष, लहुजी शक्ती सेना, लहुजी शक्ती सेनेचे जिल्हाध्यक्ष पंकज जाधव, उमेश भुजाडणे, लहुजी शक्ती सेनेचे तालुकाध्यक्ष विनोद तिरले, ज्येष्ठ पत्रकार सलमान आयशा फैयाज खान तसेच पत्रकार बांधवांसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमासाठी ज्येष्ठ पत्रकार संतोष वाघमारे, हर्षदा प्रदीप घोम (संस्थापक अध्यक्ष, अहिल्याबाई बहुउद्देशीय संस्था, अमरावती) आणि अतुल भुजाडणे यांनी सहकार्य केले. शेकडो नागरिकांनी कुटुंब व मित्र परिवारासह या कार्यक्रमाचा आनंद घेतला. सोहळ्याचे निवेदन प्रशांत टांगले आणि नीलेश मोहकर यांनी केले.

डॉ. मिर्झा रफी अहमद बेग हे प्रसिद्ध हास्य कलाकार असून, त्यांनी आपल्या करिअरमध्ये विविध मंचावर विनोदी सादरीकरण केले आहे. त्यांच्या शैलीत समाजातील विसंगतींवर मार्मिक टीका असते, जी प्रेक्षकांना हसवतानाच विचार करायला भाग पाडते. 'मिर्झा एक्स्प्रेस' हा त्यांचा लोकप्रिय कार्यक्रम आहे. त्यांच्या कलेच्या माध्यमातून त्यांनी हास्य संस्कृतीला नवे आयाम दिले आहेत. हा कार्यक्रम धामणगावच्या सांस्कृतिक क्षेत्रासाठी एक मोठा सोहळा ठरला आणि प्रेक्षकांच्या मनात गोड आठवणी सोडून गेला, असे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले.

# वंदे मातरम् ग्रुपच्या पाडवा पहाटने उजळले धामणगाव

## आ. प्रताप अडसडांनी केले भक्तीगीत सादर; नववर्षाचे स्वागत



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१धा. रेल्वे**

मराठी नववर्ष आणि गुढीपाडव्याच्या पर्वावर येथील नगर परिषदेच्या प्रांगणात वंदे मातरम् ग्रुपतर्फे पाडवा पहाट या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यामध्ये गीते व नृत्य सादर करून नवीन वर्षाचे स्वागत करण्यात आले. या कार्यक्रमात आ. प्रताप अडसडांनी संगीतमय प्रस्तुती देत नववर्षाचे स्वागत केले. चैत्राची सोनेरी पहाट, नव्या स्वप्नांची नवी लाट, नवा आरंभ नवा विश्वास, नव्या वर्षाची हिच तर खरी सुरुवात, याचा प्रत्यय रविवारी आला.

या पाडवा पहाट कार्यक्रमाला आ. अडसड, येंडे मल्टिस्पेशाटी हॉस्पिटलचे संचालक डॉ. आकाश येंडे, डॉ. पूनम येंडे व अन्य मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमात गायक पराग पदवाड, प्रदीप रुईकर, श्रावणी भडके, कृष्णाई घोटेकर, सागर ठाकरे, मृदिनी नागपुरे, सांभवी शेंडे, अधिरा नागपुरे, त्रिशा भगत यांनी सुमधूर गीते सादर करून श्रोत्यांची मने जिंकली. तर बासरीवादक जानू देहांडे, तबलावादक रवी कुलकर्णी, नीलेश रुमने, ऑर्गन वादक ऋषिकेश दुधाळ यांनी साथ दिली. निवेदन सागर ठाकरे यांनी केले. वंदे मातरम् ग्रुपचे अध्यक्ष दिनेश बोबडे, माजी अध्यक्ष नरेंद्र चौधरी, उपाध्यक्ष सुनील शिंदे, रमेश बेहरे, सचिव उमेश गोंडीक, मिलिंद तीनखडे, मोहमद शरीफ, सुनील दारोकार, प्रताप अडसड, प्रवीण कुचेरिया, अशोक बुधलानी, धनंजय पदवाड, कमल छांगाणी, शकील अहमद, दीपक धुमाळ यांनी कार्यक्रमासाठी प्रयत्न केले. प्रास्ताविक वंदे मातरम् ग्रुपचे अध्यक्ष दिनेश बोबडे यांनी केले. सूत्रसंचालन उमेश गोंडीक यांनी केले.

चिमुकल्यांनी सादर केले नृत्य येथील वंदे मातरम् ग्रुपच्या पाडवा पहाट कार्यक्रमात ईश्वरी सातरोटे, मधुरा इंगळे, आर्य वरकट, प्रिशा राठी, साची मुंधडा, उर्वी राजकर, नित्या पाठमासे, चार्वी पनपालिया, सावी राठोड, वृंदावणी ठाकरे यांनी नृत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

# ई-पिंक रिक्षासाठी लाभार्थीच मिळेनात; उद्दिष्टपूर्ती कशी?

## महिला व बालविकास विभागासमोर झाला प्रश्न निर्माण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१अमरावती**

महिला सक्षमीकरण व आर्थिकदृष्ट्या आत्मनिर्भर व्हाव्यात, या संकल्पनेतून महिलांसाठी असलेल्या ई-पिंक रिक्षा योजनेस प्रतिसाद मिळत नसल्याचे चित्र आहे. अमरावती जिल्ह्यासाठी ६०० रिक्षांचे उद्दिष्ट असताना केवळ २९३ लाभार्थी महिलांचे अर्ज आले आहेत. उद्दिष्टपूर्ती कशी करावी, असा प्रश्न त्यामुळे महिला व बालविकास विभागासमोर आता उभा ठाकला आहे.

खास महिलांसाठी २०२४ मध्ये ई-पिंक रिक्षाची योजना राज्य सरकारने महिला व बालविकास विभागामार्फत लागू केली आहे. ३.७८ लाख रुपये किमतीचा एक ई-पिंक रिक्षा लाभार्थीला एकूण रकमेच्या ७० टक्के कर्जावर उपलब्ध करून देण्यात येणार आहे. लाभार्थीनं स्वतःचा हिस्सा १० टक्के द्यायचा असून २० टक्के रक्कम राज्य सरकार देणार आहे. लाभार्थ्यांना जवळपास ८० हजार रुपयांची सबसिडी मिळणार आहे.



अमरावती जिल्ह्यासाठी ६०० रिक्षांचे उद्दिष्ट देण्यात आले असून, त्यामध्ये अमरावती शहर ३०० व ग्रामीण शहरी भागासाठी ३००, अशी विभागणी करण्यात आली आहे. वर्षभरापूर्वी लागू झालेल्या यायोजनेत आतापर्यंत जिल्ह्यातून २९३ लाभार्थ्यांचे अर्ज प्राप्त झाले असून त्यास मंजुरी देण्यात आल्याचे महिला व बालविकास अधिकाऱ्यांनी सांगितले. तत्पूर्वी लाभार्थी महिलांना ७० टक्के कर्ज विविध बँकांकडून मिळवून देण्यासाठी उत्पादक कंपनी स्वतः प्रयत्न करणार आहे. या कंपनीची चमू येणार असून ती बँकांसोबत करार करून कर्ज उपलब्ध करून देतील. यासाठी महिला लाभाथ्यर्थ्यांचे सिबिल तपासण्यात येणार आहे. या रिक्षा शहरातील कोणत्या मार्गांवर चालवण्यात याव्यात, ते प्रादेशिक परिवहन विभागाकडून निश्चित करण्यात येणार आहे. ई-रिक्षांसाठी चार्जिंग स्टेशन उभारण्यात येणार असले तरी त्यासाठी अद्याप जागेची निवड करण्यात आलेली नाही.

**ई–पिंक रिक्षातून केवळ तीनच महिलांना करता येईल प्रवास**

या रिक्षातून केवळ तीन महिलांना प्रवास करता येणार आहे. १० अश्वशक्तीचे इंजिन असलेली हीई-पिंकरिक्षा एकवेळ चार्ज केल्यानंतर ११० किलोमीटर धावते. प्रवासी क्षमता, चार्जिंगसाठी लागणारे शुल्क व कर्जावरील व्याजाचादर, यामुळे लाभार्थी या योजनेसाठी समोर येत नसल्याचे वास्तव आहे.

# उन्हाळी पिकांची आजपासून ई–पीक पाहणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१अमरावती**

उन्हाळी पिकांचा डिजिटल क्रॉप सर्व्हे १ एप्रिल ते १५ मे दरम्यान शेतकऱ्यांना करावा लागणार आहे. तशा सूचना महसूल विभागाने केल्या आहेत. खरीप व रब्बी हंगामाप्रमाणेच उन्हाळी पिकांसाठी देखील मोबाइल अॅपद्वारे पिकांचा ऑनलाइन पेरा नोंदवावा लागेल. शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी ई–पीक नोंद आवश्यक आहे.शासनाच्या सूचनेनूसार १ एप्रिलपासून उन्हाळी हंगाम गृहीत धरण्यात येतो. यामध्ये शेतकरी स्तरावरील ई–पीक पाहणी आटोपल्यानंतर सहायक स्तरावर १६ मे ते २२ जून दरम्यान डीसीएसद्वारे सहायक नोंदणी करतील. डिजिटल क्रॉप सर्व्हेमध्ये गटाच्या हद्दीवर आधारित जिओ फेन्सिंग बंधनकारक करण्यात आलेले आहे. शेतकऱ्यांच्या कालावधी आटोपल्यानंतर उर्वरित शेतकऱ्यांची पीक नोंदणी सहायक करतील.



**कोतवाल, रोजगार सेवक, आशा राहणार सहायक**

कोतवाल, रोजगार सेवक, आशा सेविका व ग्रामस्तरीय मानधनावर कार्यरत इतर विभागाचे कर्मचाऱ्यांमधून तहसीलदार प्रत्येक गावासाठी सहायकाची नियुक्ती करणार आहे. ज्या गावांमध्ये सहायक नाही अशा गावात 'माय भारत' पोर्टलवर नोंदणी केलेल्या नेहरू युवा केंद्रांचे स्वयंसेवक यांची नियुक्ती करण्यात येणार आहे. सहायक हा शेतकऱ्यांच्या पीक नोंदीला सहकार्य करेल, व त्यांना येणाऱ्या अडचणी सोडविण्यास मदत करणार आहे.

# प्रा. राम मेघे इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड रिसर्चच्या विद्यार्थ्यांची टिसीएस मध्ये निवड

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१बडनेरा**

प्रा. राम मेघे इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड रिसर्च, बडनेरा येथील विद्यार्थी आकाश पंडित, वेदांत पेटे आणि तनुश्री वडूरकर यांनी प्रतिष्ठित ढउड कोडवीटा स्पर्धेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या निवडीमुळे संस्थेच्या गुणवत्तेचा पुनरुच्चार झाला असून, विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी एक महत्वपूर्ण पाऊल ठरले आहे.विदर्भ युथ वेलफेअर सोसायटीच्या अध्यक्ष




डॉ. नितीन धांडे, उपाध्यक्ष अॅड. उदय देशमुख, कोषाध्यक्ष प्रा. डॉ. हेमंत देशमुख, सचिव श्री युवराजसिंग चौधरी आणि कार्यकारिणी सदस्य श्री नितीन हिवसे, प्रा. डॉ. सौ. पुनम ताई चौधरी, श्री पंकज देशमुख, प्रा. विनय गोहाड, प्रा. गजानन काळे तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गजेंद्र बमनोटे यांच्या मार्गदर्शनात प्लेसमेंटसाठी विशेष उपक्रम राबविले जातात. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांसाठी विविध कार्यशाळा, व्याख्याने आणि प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. महाविद्यालयाने शैक्षणिक सत्र २०२४–२५ मध्ये ३०० हून अधिक विद्यार्थ्यांचे नामांकित कंपन्यांमध्ये प्लेसमेंट सुनिश्चित केले असून, संपूर्ण अमरावती विभागात असे यश मिळवणारे हे एकमेव महाविद्यालय ठरले आहे. मागील सत्रात (२०२३–२४) तब्बल ७०४ विद्यार्थ्यांनी विविध नामांकित कंपन्यांमध्ये स्थान मिळवले होते. याशिवाय, महाविद्यालयाला NAAC व NBA मानांकन प्राप्त असून, विद्यार्थ्यांना उद्योग क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील आहे.विद्यार्थ्यांच्या या अपूर्व यशाबद्दल विदर्भ युथ वेलफेअर सोसायटीचे अध्यक्ष डॉ. नितीन धांडे यांनी आनंद व्यक्त केला आहे.हे सर्व प्रशिक्षण आणि प्लेसमेंट उपक्रम ट्रेनिंग अँड प्लेसमेंट डीन डॉ. निक्कू खालसा यांच्या मार्गदर्शनाखाली, प्लेसमेंट ऑफिसर प्रा. आनंद चौधरी आणि ट्रेनिंग ऑफिसर डॉ. प्रांजली देशमुख यांच्या अथक प्रयत्नांमुळे सातत्याने यशस्वीरित्या राबविले जात आहेत.

# डॉ. अनिल सावरकर विद्यापीठातील संत गाडगे बाबा अध्यासन केंद्राला भेट

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१अमरावती**

संत अच्युत महाराज हार्ट हॉस्पटल व रिसर्च इन्स्टिटयूटचे अध्यक्ष डॉ. अनिल सावरकर यांनी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील संत गाडगे बाबा अध्यासन केंद्राला भेट दिली. त्यांच्या समवेत कुलगुरू डॉ. मिलींद बाराहाते, प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, संत वासुदेव महाराज



ज्ञानपीठ संस्था, अकोटचे अध्यक्ष श्री वासुदेवराव महल्ले, अकोला येथील सुखदेवराव भुतडा, विद्यापीठ व्य.प. सदस्य डॉ. व्हीएम मेटकर, मुख्य प्र–कुलगुरू डॉ. जामोदे, श्री प्रकाश साबळे, डॉ. गुणवंत धाणे, श्री पाशेबंद, श्री आमले आदि उपस्थित होते. सर्वश्री किशोर ब्रुक यांनी गाडगे बाबा यांच्या जीवनचरित्रावरल्या सर्व मान्यवरांचे विमोचन करण्यात आले.

# अमरावती शहरातील अनियमित पाणीपुरवठा बाबतीत शहर काँग्रेसने मजिप्राच्या अधिकाऱ्यांना धरले धारेवर

## सुरळीत पाणीपुरवठा केला नाही तर पालकमंत्र्यांना घालणार घेराव

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१अमरावती**

सध्या उन्हाळ्याचे दिवस सुरू आहे.शहरातील संपूर्ण नागरिक उन्हाने त्रस्त आहेत.मागील गेल्या एक ते दीड महिन्यापासून अमरावती शहरातील बहुतांश भागामध्ये पिण्याच्या पाण्याचे अतोनात हाल सुरू आहेत व यामुळे शहरातील नागरिक मोठ्या प्रमाणावर त्रस्त झालेले आहे.शहरातील काही भागातील परिसरामध्ये रात्रीचे ११:०० - १२:०० वाजता पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणे सुरू आहे.रात्रीच्या वेळी पाणी सोडण्याचे कार्य हे एकदम अयोग्य आहे.यासर्व बाबींवर मजिप्रा कार्यालयात विचारणा केल्यावर प्रत्येक वेळेस वेगळी - वेगळी कारणे देण्यात येतात.तसेच शहरात एक दिवस आड पाणीपुरवठा करण्यात येतो आहे.वारंवार तक्रार करून सुद्धा यावर कुठलाही तोडगा काढण्यात येत नाही आहे. त्यामुळे संतप्त झालेल्या काँग्रेस



पदाधिकाऱ्यांनी आज मजीप्राच्या अधिकार्यांना चांगलेच खडेबोल सुनावले.

अमरावती शहरात पाण्यासाठी नागरिकांचे अतोनात हाल होणार असल्याचे चित्र शहरातील अनेक भागात आहे..वारंवार तक्रारी करून सुद्धा यावर महाराष्ट्र जिवन प्राधिकरणामार्फत कुठलाही तोडगा काढण्यात येत नाही आहे तसेच निगरगट्ट महाराष्ट्र शासन सुद्धा झोपी गेलेलं आहे.म्हणून आज मंगळवार दिनांक १ एप्रिल २०२५ रोजी काँग्रेस पक्षाचे शिष्टमंडळ कार्यकारी अभियंता यांचेसोबत चर्चा करतांना महाराष्ट्र जिवन प्राधिकरण कार्यालय अमरावती येथे अमरावती शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष बबलु शेखावत यांच्या अध्यक्षतेमध्ये तसेच माजी महापौर विलास इंगोले,माजी महापौर मिलिंद चिमोटे,प्रदेश उपाध्यक्ष भैय्याजी पवार,महिला काँग्रेस अध्यक्षा जयश्री वानखडे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये मजिप्रा अधिकाऱ्यांना धारेवर धरले .यावेळी मजिप्रा अधिकाऱ्यांनी काँग्रेसच्या शिष्टमंडळाला सांगितले की,अमरावती शहराला जेवढ्या पाणीपुरवठ्याची गरज आहे तेवढे पाणी अमरावती मजीप्राला आणणे शक्य होत नाही आहे कारण ज्या मोठ्या पाईपलाईन्स आहेत त्या पाईपलाईन्स कमकुवत झालेल्या आहेत त्या फुटून राहिलेल्या आहेत.म्हणुन महाराष्ट्र जिवन प्राधिकरणामार्फत पाणीपुरवठा कमीत प्रमाणात होत आहे.यावर काँग्रेसच्या शिष्टमंडळाने मागणी केली की,नवीन पाईपलाईन्सचे कार्य पूर्ण का बर होत नाही आहे ? त्यावर मजीप्रा अधिकाऱ्यांमार्फत माहिती देण्यात आली ऑक्टोबर २०२४ ला वर्कऑर्डर दिल्यानंतर सुद्धा ठेकेदार काम करत नाही.

काँग्रेसच्या शिष्टमंडळाने मागणी केली की,अशा ठेकेदारावर कारवाई झाली पाहिजे,शहरातील जनतेला महाराष्ट्र राज्य विद्युत विभागाचा वीज पुरवठा वारंवार खंडित होत राहतो त्यामुळे पाणीपुरवठा योग्य रित्या करणे शक्य होत नाही आहे.यावर काँग्रेसच्या शिष्टमंडळामार्फत संताप व्यक्त करण्यात आला.काँग्रेसच्या शिष्टमंडळामार्फत पुन्हा प्रश्न विचारण्यात आला की,जिल्हा नियोजनाच्या बैठकीमध्ये सदर सर्व मुद्दे का बर पुढे करण्यात येत नाही ? याचा अर्थ शासन व प्रशासन यांचे आपसात कुठलेही नियोजन नसल्यामुळे अमरावती शहरातील जनतेला अत्यंत त्रास सहन करावा लागतो आहे.येणाऱ्या काळात यासर्व यंत्रणांनी शहरातील नागरिकांना सुरळीत पाणीपुरवठा केला नाही तर जिल्ह्याच्या पालकमंत्र्यांचा घेराव अमरावती शहर (जिल्हा) काँग्रेस पक्षाच्या वतीने करण्यात येणार आहे.याप्रसंगी प्रामुख्याने संजय वाघ,अशोक डोंगरे, मुन्ना राठोड,प्रदीप हीवसे, शोभा शिंदे,वंदना कंगाले, ज्योत्स्ना गुल्हाने, सलीम मीरावाले, रमेश राजोटे, गुड्डू हमीद,संजय बोबडे,गजानन जाधव, राजाभाऊ देशमुख,अतुल काळबेंडे, अभिजित गुल्हाने, अफझल पठाण,पंकज मेश्राम, अभिनंदन पेंढारी,अशोक डोंगरे,राजीव भेले,विकी उर्फ विशाल वानखडे,वैभव देशमुख, संजय बोबडे,प्रकाश पहूरकर,मुकेश छांगाणी, सचिन निकम, वंदना थोरात, बरकात अली,छोटू शाह, फैजान अली,अतुल देशमुख, गजानन राजगुरे,कलीम शाह, भैय्यासाहेब निचळ,विजय आठवले,शुभम बांबल,संकेत साहू,सुरेंद्र देशमुख,विकास धोटे,सुनील पडोळे,अरुण बनारसे,नाना बारबुद्धे,अजीम भाई,सुनंदा कोल्हे,उषा वानखडे,रोशनी कठाने,माया खोब्रागडे,निकोसे ताई,ललिता जनबंधू,सीमा राऊत, अनिता कोटांगळे, अन्नपूर्णा टेंभुर्णी,राखी वालदे, शीतल खराटे, शीतल कोटांगळे, दमयंती कोटंगळे, उके ताई, सुवर्ण मोहोड, वरघाट ताई,विमल गाडे, ताईबाई झंळे, मोहोड ताई यांचेसह शेकडो मान्यवर उपस्थित होते.

# अमरावती परतवाडा महामार्गावर आष्टी गावाजवळ कचऱ्यात सापडला मृतदेह



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१वलगाव**

अमरावती परतवाडा महामार्गावर आष्टी गावाजवळ रस्त्याच्या बाजूने एका अज्ञात इसमाचा शव कचऱ्यात आढळून आला आहे हि संपूर्ण घटना दिनांक ३१ रोजी सोमवारी सकाळी सातच्या सुमारास उघडकीस आली आहे वलगाव पोलिसांना हि संपूर्ण घटना माहित पडताच वलगाव पोलीस तात्काळ घटनास्थळी दाखल झाले व मृतदेहाची कसून चौकशी चालू केली आहे मृतकाचे शरिर मोठ्या प्रमाणात सुजलेल्या अवस्थेत होते चेहऱ्यावर देखील जखमा झाल्या होत्या मोठ्या प्रमाणात मृतदेहाला वास सुटला होता अश्यातच घटनेचं गांभीर्य लक्षात घेता वलगाव पोलिसांनी रुग्णवाहिकेच्या मदतीने मृतदेहाला शवाविच्छेदनासाठी अमरावती जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल केले आहे शवविच्छेदन अहवालातुन नेमकं काय समोर येते हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

# शेतकऱ्यांना हिरव्या मिरचीने रडविले

## सुरुवातीपासूनच रोगराईचे सावट, मालाला भाव नाही

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१वरुड**

जिल्ह्यात मिरचीचे पीक घेतले जाते. यावर्षी मिरचीचे पीक उत्तम होऊन चांगला भाव मिळेल, अशी शेतकऱ्यांना अपेक्षा होती. पण, मिरची उत्पादक शेतकऱ्यांना यंदाही हिरव्या मिरचीने रडविले आहे.

जिल्ह्यात शेतीला जोडधंदा म्हणून मिरचीचे पीक घेतले जाते. काही शेतकरी उन्हाळी पीक म्हणून हिरव्या मिरचीची लागवड करतात. मिरची उत्पन्नातून कुटुंबाचा उदरनिर्वाह होतो. मार्च महिन्याच्या पहिल्या आठवड्यात हिरव्या मिरचीच्या किमतीत फार मोठी घसरण झाली होती. सात ते आठ रुपये



प्रतिकिलो या भावाने शेतकऱ्याला मिरची विकावी लागली. परिणामी, मिरची तोडणाऱ्या मजुरांच्या मजुरीसुद्धा शेतकऱ्याला खिशातून द्यावे लागले. येत्या दिवसात चांगला भाव मिळेल, अशी शेतकऱ्यांची अपेक्षा होती; पण मिरचीचे भाव अजूनही वाढले नसल्याने शेतकरी वर्ग चांगलाचचिंतेत सापडला आहे. धानाच्या शेतीपेक्षा मिरचीच्या शेतीला खर्च आणि मेहनत जास्त लागते. यंदा सुरुवातीपासूनच मिरचीच्या बागाला रोगराईने घेरले होते. दिवाळीनंतर अनेकदा वातावरणाच्या अदलाबदलीमुळे हलक्या पावसाचा मिरची पिकाला चांगलाच फटका बसला. रासायनिक फवारण्या करून बागांना सावरता आले नाही.

### तीन वर्षांपासून उत्पादन व दराची घसरण कायम

दरवर्षी मिरची लागवडीचे क्षेत्र वाढत आहे. पण, मागील दोन-तीन वर्षांपासून मिरचीच्या उत्पादनात आणि भावात खूप मोठी घट बघायला मिळते. शेतकऱ्यांनी लावलेला खर्चसुद्धा निघेनासा झाला आहे. खर्च जास्त, उत्पादन कमी अशी अवस्था आहे. बागायती जागा कमी करून पुन्हा धनाची शेती करण्याचा विचार शेतकरी करीत आहेत.

### कुटुंबाप्रमाणे जपावे लागते पिकाला

मिरची झाडाची दर दिवस पाहणी करावी लागते. एखाद्या झाडाला रोग दिसल्यास रासायनिक औषधांची फवारणी करावी लागते. एका फवारणी परिणाम न झाल्यास त्यावर पुन्हा जास्त किमतीचे औषध फवारले जातात. आठवड्यातून दोनदा पाणी, रासायनिक खते, वारंवार फवारण्या शेतकऱ्यांना कराव्या लागतात.

# सोशल मीडियाचा गैरवापर; तर होणार कठोर शिक्षा

## पोलिसांचा असतो वॉच : वादग्रस्त विषय शेअर करणेही धोकादायक



### सोशल मीडियाचा जपून वापर करावा



दोन समाजात, धर्मीयांत तेढ निर्माण होईल किंवा कोणाच्या भावना दुखावल्या जातील, अशा पोस्ट कोणीही करू नयेत. सोशल मीडियावर आमच्या चमूचा वॉच असतो. त्यामुळे कायदेशीर कारवाईला सामोर जावे लागू शकते.

**नविनचंद्र रेड्डी (पोलीस आयुक्त)**

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१अमरावती**

हल्ली सोशल मीडियाचा मोठ्या प्रमाणात वापर होत असून, त्याचे पडसादही उमटताना दिसत आहेत. अनेकजण आपल्या भावनांना सोशल मीडियावर वाट मोकळी करतात. मात्र, ते करताना कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास कारवाईला सामोरे जावे लागू शकते. हे टाळण्यासाठी सोशल मीडियाचा वापर करताना सामाजिक भान जपले जाणे आवश्यक आहे. अन्यथा तुमच्या अजाणत्यापणातून घडलेल्या कृत्याच्या परिणामांची झळ कुटुंबीयांना बसू शकते.

**सोशल मीडियाचा सुरक्षित वापर करा**

सोशल मीडिया लहान चिमुकल्यापासून तर ज्येष्ठ नागरिकांच्या आवडीचे आहे. बरेचजण दिवसभर त्याचा वापर करत असतात. सोशल मीडियाचा वापर विरंगुळा, ज्ञान, व्यवसाय यासाठी होणे आवश्यक आहे. तरुणांनी सोशल मीडियाचा त्यासाठीच अधिक वापर करणे आवश्यक आहे. मात्र, अनेकजण त्याचा गैरवापर करताना दिसून येतात. त्यामुळे गुन्हा दाखल होऊ शकतो.

**गुन्ह्यांची कारणे**

**राजकीय वादग्रस्त पोस्ट :** अनेकवेळा राजकीय पोस्ट व्हायरल करून त्यातून तेढ निर्माण करण्याचे प्रकार घडतात. लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीच्या काळात असे अनेक प्रकार निदर्शनास आले आहेत. फेक न्यूज पसरवणे :अनेकवेळा न घडलेली बातमी किंवा घटना व्हायरल करून सामाजिक स्वास्थ्य बिघडविण्याचे प्रकार होतात.

**सामाजिक तेढ निर्माण करणारे पोस्ट :** कुणाचाही सामाजिक भावना दुखावणाऱ्या तसेच आपत्तीजनक भावना पोस्ट करून सामाजिक तेढ निर्माण करणे.

# शाळेच्या पहिल्या दिवशी आमदारसाहेब प्रवेशित चिमुकल्यांना करणार गुडमॉर्निंग

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१अमरावती**

सन २०२५-२६च्या शैक्षणिक सत्रात शाळेच्या पहिल्या दिवशी आमदार, अधिकारी व अन्य लोकप्रतिनिधी विद्यार्थ्यांचे स्वागत करणार आहेत. शालेय शिक्षण विभागाने '१०० शाळांना भेटी' कार्यक्रमांतर्गत हा उपक्रम राबविला जाणार आहे.

पहिल्या इयत्तेत येणाऱ्या लहान मुलांसाठी शाळेचा पहिला दिवस काहीसा आव्हानात्मक असतो. आईवडिलांचा हात सोडून शाळेच्या इमारतीत येताना अनेक मुलांना




भावनात्मकदृष्ट्या अडचणी येतात. मात्र मुलांसाठी हा दिवस आनंददायी करण्यासाठी शिक्षण विभागाकडून हा उपक्रम राबविला जाणार आहे.भेटीदरम्यान शाळा इमारत, विद्यार्थ्यांसाठी खेळाच्या सुविधा, विद्यार्थ्यांच्या स्वच्छतेच्या सवयी, शालेय पोषण आहार यांचाही आढावा घेतला जाणार आहे. या माध्यमातून संवाद वाढेल.

**समस्या होणार अवगत**

शाळेची धोकादायक इमारत, अस्वच्छ किंवा पाण्याअभावी बंद शौचालये अशा समस्या आढळल्यास अधिकारी वर्ग तातडीने त्या सोडविण्यासाठी सूचना देतील. त्यामुळे शाळांमधील अनेक समस्या तातडीने निकाली निघण्याची शक्यता आहे.

'१०० शाळांना भेटी' हा उपक्रम राबविण्याबाबत शासनस्तरावरून निर्देश आहेत. त्यानुसार पुढील शैक्षणिक सत्रात जिल्हाभर उपक्रम राबविला जाणार आहे अशी माहिती शिक्षणाधिकारी यांनी दिली.

# उद्याला विभागस्तरीय शिक्षक समस्या निवारण सभा : प्रश्न अनेक समाधान एक : बच्चू कडू

## प्रहार शिक्षक संघटनेचे आयोजन : माजी राज्यमंत्री बच्चु कडू यांची प्रमुख उपस्थिती व मार्गदर्शन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१अमरावती**

अमरावती विभागातील जिल्हा परिषद ,नगरपालिका, महानगरपालिका, खाजगी अनुदानित, विनाअनुदानित आश्रम शाळा, समाज कल्याण अंतर्गत असलेल्या शाळा यातील कर्मचाऱ्यांच्या विविध समस्या वारंवार पाठपुरावा करून देखील प्रलंबित असल्याने त्या तात्काळ सोडवण्यासाठी प्रहार शिक्षक संघटनेचे वतीने अमरावती विभागीय स्तरीय शिक्षक समस्या निवारण सभेचे आयोजन करण्यात आले आहे. या समस्या निवारण सभेला प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष माजी राज्यमंत्री बच्चु कडू हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहणार आहेत.

दिनांक २ एप्रिल बुधवार रोजी दुपारी दोन वाजता प्रहार जनशक्ती पक्ष कार्यालय कुरळपूर्णा तालुका चांदुर बाजार येथे सदर सभेचे आयोजन केले असून यामध्ये सत्र एक मध्ये जिल्हा निहाय प्रहार शिक्षक संघटनेचे कार्याचा आढावा घेण्यात येणार आहे. त्यानंतर उत्कृष्ट काम करणारे पदाधिकारी यांचा सत्कार तसेच शिक्षकांच्या विविध प्रलंबित प्रश्नांचा निपटारा जागेवरच करण्यात येणार आहे. ज्या समस्या जिल्हास्तरावर किंवा विभाग स्तरावर प्रलंबित आहेत



त्या सोडवण्यासाठी विभाग स्तरावर बैठकीचे आयोजन करण्यात येईल. तसेच शासन दरबारी प्रलंबित असलेले प्रश्न निकाली काढण्यासाठी मंत्रालय स्तरावर सुद्धा लवकरच समस्या निवारण सभा झाल्यानंतर बैठकीचे आयोजन करण्यात येणार आहे.

शिक्षकांचे अनेक प्रश्न विविध स्तरांवर प्रलंबित असून ते सोडवण्यासाठी प्रहार शिक्षक संघटने कडे वारंवार पाठपुरावा करण्यात येतो.एकाच ठिकाणी ते प्रश्न निकाली काढण्यासाठी सदर सभेचे आयोजन माननीय बच्चुभाऊ कडू यांच्या उपस्थितीत करण्यात आले असून ,विभागातील सर्व शिक्षकांनी याचा लाभ घ्यावा.

**महेश ठाकरे,राज्याध्यक्ष ,प्रहार शिक्षक संघटना**

सदर सभेमध्ये जुनी पेन्शन लागू करणे,शिक्षण सेवक योजना बंद करणे, संच मान्यतेचा अन्यायकारक शासन निर्णय १५मार्च २०२४ रद्द करणे, अमरावती विभागाअंतर्गत प्रलंबित पदोन्नती, निवड श्रेणी, त्रिस्तरीय आश्वासित चट्टोपाध्याय योजना , जन सुरक्षा विधेयक रद्द करणे, वस्तीशाळा शिक्षकांचे विविध प्रलंबित प्रश्न, डीसीपीएस अंतर्गत कपात रक्कम जीपीएफ मध्ये वळती करणे, जिल्हा अंतर्गत बदली धोरण ,आंतर जिल्हा बदली धोरण ,उर्दू शिक्षकांची बिंदू नामावली सह शिक्षकांच्या विविध वैयक्तिक व सामूहिक प्रश्नांवर माजी राज्यमंत्री बच्चु कडू संघटना व शिक्षकांसोबत प्रत्यक्ष संवाद साधणार आहेत.तसेच त्या समस्या तात्काळ मार्गी लावण्यासाठी सभेमध्ये नियोजन करण्यात येणार आहे. तरी विभागातील अधिकाधिक शिक्षकांनी सभेमध्ये उपस्थित राहून आपले प्रश्न मार्गी लावण्याचे आवाहन प्रहार शिक्षक संघटनेच्या वतीने राज्याध्यक्ष महेश ठाकरे यांनी केले आहे.